
सन १९६९

# परमेश्वराच्या चुका



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल वा.
दा. क्र. १२५७९

IRBK-0112979
IRBK-0112979

वसन्त देशमुख

वाचनालय ७१६०१
३१।३।७०
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७१६०१ वि
क्रमांक नोंद दि ३१-३-७

# परमेश्वराच्या चुंका

## वसंत देशमुख

कांहीं सजीव प्रमादांच्या
व्यक्तिमत्वाच्या जडणघडणींत
घडविणारा कुठें कुठें व कसकसा
उणा पडला त्याचा हा पाढा

चेतक पुस्तकें
चिराबाजार, मुंबई २

किंमत अडीच रुपये

IRBK-0112979

© चेतक पुस्तकें

पहिली आवृत्ति
गुढीपाडवा, शक १८९१

मुद्रक : अ. पु. जोशी
रामदास मुद्रणालय
शिवाजी पार्क रोड नं. ३
दादर, मुंबई २८

प्रकाशक : बा. ग. ढवळे
चेतक पुस्तकें
गिरगाव
मुंबई २

ग्रौं. ९५. १२९६९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ७१६०१ वि. बा. वा.
क्रमांक ३७७० नोंद दि ३१.३.७०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
ग्रा. क्र. १२९६९ नों. दि
वि. बा. वा. क्र.

शिवाजीमहाराज
मिठाईचे पेटारे
पाठवीत असतांना
ते कसोशीनें
न तपासण्याची
जी भाग्यशाली
चूक झाली

ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ

त्या चुकेस . . .

ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ ꕥ

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ५७६०१ वि. ना। पा
क्रमांक ३११० नोंद दि ३१-३-७८

# चुकांचा पाढा

ती एक चूक झाली. मोठीच चूक झाली ! देवानें हें जग निर्माण केलं ! विचित्र, सुंदर, अफाट ! मानवाची निर्मिति ही तर महाभयानक घोडचूक. खरं म्हणजे देवचूक ! त्या दैवी प्रमादांचंच हें पारायण !

ईश्वरनिर्मित कांहीं सजीव प्रमाद, आपापली कैफीयत जगन्नियंत्यासमोर मांडताहेत ही कल्पना ! नुसती कैफीयतच नव्हे ! आपापल्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणींत, घडविणारा कुठें कुठें व कसकसा उणा पडला ह्याचाही हा पाढा !

ह्या इच्छुकांच्या अंतःप्रेरणेनुसार विश्वनिर्मिति होती तर ? तर काय झालं असतं कुणास ठाऊक ? कदाचित् त्या तशा विश्वाचा विनाश कांहीं कोटि वर्षं लांबणीवर पडता ! पण ... पण हीच सर्वांत मोठी जगड्व्याळ चूक झाली नसती ना ?

वसंत गोविंद देशमुख

द्वारका सदन,
शिवाजी पार्क,
दादर, मुंबई.


गुढीपाडवा,
शक १८९१

# चुकांची यादी

मोहाची मूर्तिमंत मूर्ति ९
काकतालीय न्यायेन । १२
गजेंद्राला हवा कपाळमोक्ष ! १६
ढेकणासंगें ... २०
जंगलचा राजा २४
ज्याच्या हातीं ससा ... कीं २९
वाघ म्हटला तरी ... ३३

कोल्हा काकडीला राजी ! ३८
आर्धीच मर्कट ... ! ४३
पयःपानं भुजंगानाम् ... ४८
बंदिवान पोपटा ऽ ५३
कुत्र्याचं शेपूट ... ५७
बैल गेला नि ... ६२
गोमातेला चारा ऽ ऽ ... ६७
लागले का विंचू ... ७२
पाण्यांत न रांहातां माशांशीं वैर ७६
आडवं मांजर ८१
काय रे ! घोड्यावरसा ? ८६
परमेश्वर उवाच । ९२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ........ नोंद दि ........



# मोहाची मूर्तिमंत मूर्ति

देवा, आपण मला एवढं सुंदर करायला नको होतं! मत्सर, मत्सर, मत्सर ! माझ्या पिसाऱ्यांतला हिरव्या रंगापेक्षां जास्त गडद असा मत्सर! खुद्द माझी धर्मपत्नीही माझा मत्सर करते, द्वेष पिसारते ! जळजळ चीत्कारते ! आपण मला रोमरोमांत सुंदर केलंत! कां बरं हा खटाटोप केलात ? 'या कुन्देन्दुतुषारहारधवला' देवी सरस्वतीचं मी वाहन म्हणून का ? समर्थाघरच्या श्वानापेक्षां माझा दर्जा मोठा ! पण ह्या उडत्या समाधानाच्या प्राप्तीसाठीं मला माझी मनःशांति कायमची गमावून बसायला लागलंय् !

पिसांचं अवजड धूड सारखं सांभाळायचं! आषाढ-श्रावणांतल्या पर्जन्यधारांचं सहर्ष स्वागत करण्यासाठीं मोरपिशी भोळसटपणानें चांगलं कारंजासारखं थुईथुई नाचायचं ! बेभान होऊन ! वेडं होऊन ! स्वच्छंदपणें ! एवढा सुंदर नाचतों मी ! पण हें निसर्गरम्य नृत्य दुसऱ्यासाठीं ! मी आपला असाच—असंतुष्ट ! देवी सरस्वतीपासून तों मोगल बादशहापर्यंत सर्वांनीं माझा उपयोग करून घेतलाय् ! हूं ! म्हणे मयूरसिंहासन ! माझ्या खुडलेल्या पिसांचा जसा कृतघ्न मानव पंखा करतो, तस्सेच तुकडे तुकडे झाले आहेत त्या मयूरसिंहासनाचे !

देवा, माझ्या सौंदर्यामुळेंच मी अल्पायुषी होतों हो ! माझ्या चवदार देहांत हिंस्र श्वापदांचीं तीक्ष्ण नखं जेव्हां घुसतात, तेव्हां आकाशाच्या नीलिम्याला लाजविणाऱ्या स्वरूपसुंदर अशा माझ्या नीलदेहाचा विचार कुणी करीत नाहीं ! पण मी म्हणतों, ही अशी झडप घालणारं जनावर असतं. जनावर हिंस्र नि भयानक ! पण ... पण देवा ! माणूस हें सर्वांत हिंस्र नि भयानक जनावर आहे ! कधीं जाळ्यांत बेमालूमपणें पकडून, कधीं क्रौंचवधाच्या क्रौर्याला लाजवून, रक्तपिपासु माणूस आपली राक्षसी तहान भागवीत असतो !

त्याच्या बाणानें माझा फडफडणारा देह कायमचा थंडावणार आहे, हें त्याला माहीत असतं ! पण हिंसेची आग असते मस्तकांत ! त्याच्या कलुषी जाळ्यांत माझी दैवी शान बरबाद होणार, ह्याची उमज त्याला असते ! सरस्वतीदेवीनें ( जिचं गोड ओझं माझ्या पाठीवर असतं ) दिलेल्या बुद्धीचा जास्तींत जास्त दुरुपयोग करणारा प्राणी म्हणजे माणूस !

मोहाकडे सर्वांत जास्त आकर्षिला जातो तो माणूसच ! नि मी तर मोहाची मूर्तिमंत सजीव अशी पिसारलेली मूर्ति !

इंद्रधनुष्याचीं खांडं करून आपण माझ्या पिसापिसांतून त्यांना रिचवलंत! घननीळ भगवान् श्रीकृष्णाचा रंग माझ्या देहीं मिसळविलात! तें धनुष्य उचलल्यावर आरक्त, झालेल्या सीतामाईच्या कपोलावरील छटा आपण माझ्या कंठाखालीं टासल्यात! वेभान होऊन प्राण वांचविण्यासाठीं चक्रव्यूहाचा भेद करण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत मोकाट धावत सुटलेल्या अभिमन्यूच्या पायांतलं चापल्य आपण माझ्या पदद्वयांना दिलंत! एवढ्या अनुपम सौंदर्याला एखादं गालबोट, एखादी तीट, असावी म्हणूनच कीं काय, आपण मला कंठ जो दिलात तो कर्कश! श्रावणकुमाराच्या अखेरच्या किंकाळीसारखा!

सरस्वतीदेवीची उपासना मीं जर करायला हवी होती, तर आपण कोकिळेचा गळा मला द्यायला हवा होतात! सरस्वतीचा नादमधुर वीणाझंकार नि माझा कर्णकर्कश कंठरव, असा विलक्षण विरोध दाखवून, आपण काय बरं साधलंत?

मी चंदनाच्या झाडावर बसलों, तर तें सुशोभित होतं, त्या देहापलीकडचं निळं आकाश मला लाजतं! माझा पदन्यास म्हणजे सौंदर्यझंकार! पण... पण त्यामुळें दुष्मनी फार! देवा! स्वरूपसुंदर राजपूत कन्या जोहार तरी करीत होत्या! आमच्या नशिबीं तेंही नाहीं!

ही एवढी खैरात एकाच ठायीं करणं ही आपली चूक! आपल्या चुकीमुळें हें अल्पायुष्य नि आत्मघात! ज्या सौंदर्याचा पिसारा मी निसर्गावर नि माणसांवर हौसेनें ढाळतों, तेच तर माझे पंख छाटतात! आपण मला सवाई जटायु केलंत तें असं! दुर्गुणांप्रमाणेंच सद्गुणांचाही अतिरेक झाला, म्हणजे तो विनाशाप्रत नेतो, तो हा असा बरं देवाऽऽऽ!




# काकतालीय न्यायेन ।

इन्द्रधनुष्यी मोरपिसांच्या झगमगत्या पार्श्वभूमीवर माझं काळंकुट्ट 'सौंदर्य' विशेषच उठावदार दिसतं! माझ्या तथाकथित कुरूपतेमुळेंच मोरांसारख्या कांहीं ऐटबाज, ढंगदार नाच्यापोऱ्यांची मिजास ह्या जगाच्या तमाशांत चालवून घेतली जाते.

काळा रंग हा अशुभ मानण्याची हिंदु चूक परंपरागत! पण ह्या मूर्ख समजुतींतही सातत्य नाहीं. दक्षिण भारतांत तर काळा रंग कित्येक ठिकाणीं शुभ मानला जातो. इतकंच काय, पण कृष्णवर्णाची जननी जी अमावास्या तीही शुभ मानतात कुठें कुठें!

ज्या देशांतल्या बहुसंख्य लोकांचा वर्ण काळा आहे, त्या लोकांनीं तरी माझा तिरस्कार करण्याचं खरं म्हणजे कांहींच कारण नाहीं. खरं म्हणजे माझी पात्रता 'राष्ट्रीय पक्षी' होण्याची!

माणूस मोरासारखा असतो का? हाँ! एका दृष्टीनें असतोही म्हणा! माणूस मोरासारखा नाचरा असतो. आपल्याच काल्पनिक सौंदर्यात तो दंग असतो. दिखाऊपणा हाच दोघांचाही स्थायीभाव! वाणीची कर्कशता सारखीच! दोघेही सरस्वतीचे दांभिक भक्त! दोघांचाही जगाला उगाचच भार! माणूस नि मोर जगांत नसते, तर जग नक्कीच सुखी झालं असतं!

माझं तसं नाहीं! माझ्याइतका नसला, तरी गीता सांगणारा भगवान् श्रीकृष्ण थोडा माझ्याच रंगाचा! निळ्याभोर आभाळाची शोभा, काळ्याकुट्ट रजनीच्याच पार्श्वभूमीवर जास्त उठून दिसते. सप्तरंगी मयूराची शान माझ्यामुळेंच खुलते!

पण देवा, आपण माझ्या बाबतींत फारच अन्याय केला आहे. तशाच चुकाही! मला दगडी कोळशासारखं करून आपण काय मिळवलंत? मानवी समाजांतला ज्वालाग्राही वर्णसंकर तुम्ही आमच्या उडत्या विश्वांतही आणलात! आमची जात असंख्य कुब्जांची! तीळभरसुद्धा सौंदर्य कुठें नाहीं! वाणी कर्कश नि अशुभसूचक! ह्या दिवसांत पाहुणे येण्याची नांदी पुकारणं हेंही पापच! संतापलेल्या यजमानीणबाई लाटणंच अंगावर उगारतात.

निसर्गाची साफसफाई आम्ही करतों. तरी कृतघ्न जळजळीत कटाक्षच काय ते आमच्या वांट्याला येतात. लोकोत्तर लोकसेवेचं हेंच काय तें बक्षीस! हें असलं अभद्र कौतुक! आम्ही तर खगसृष्टींतले अस्पृश्य–हरिजन! पण सर्वांनीं झिडकारलेल्या ह्या किळसवाण्या कार्याचा वांटा आपण नेमका आमच्याकडेच दिलात!

जगाचा हा न्यायच आहे. काम कर कर करतात, ते झिजून झिजून लवकर मरतात. मानस सरोवरांतल्या राजहंसांनीं, मंद वायूनें उमटविलेल्या वर्तुळाकार लहरींच्या ठेक्यावर संथपणें विहार करावा ! लहर येईल तेव्हां ! कोकिळेनें कूजन करावं नि स्वतःचा घसा फुटेपर्यंत स्वप्नाळू कविराजांनीं त्याचं गुणगान करावं !

देवा, आपण पक्षपात केलात — फारच पक्षपात केलात ! आम्हांलाही कुठेंतरी महत्त्व असावं असं वाटत नसेल काय ? संमेलनांतला स्वयंसेवक कोपऱ्यांत उभा राहून आपला रेशमी कापडी बिल्ला सारखा करीत असतो. तुळतुळीत झालेल्या टकलावरच्या दोनचार केसांचा भांग पाडण्याची केविलवाणी खटपट एखादा महाभाग करीत असतो ! सात बाळंतपणांत अंबाड्याची जी सुपारी झालेली असते, तिच्याभोवतीं कलाबतूनें झगमगणारा तिहेरी गजरा माळण्याचा ‘ फुलेरी ’ प्रयत्न एखादी वृद्धा करीत असते ! साहेबाच्या खोलीबाहेर जांभई देणारा पट्टेवाला, नागरिकाला कायदा दाखवून आपलं महत्त्व पटवून देतो ! स्मशानांतला डोंब, ओंडके आणायला जास्तींत जास्त वेळ लावून, आपलं स्मशानांतलं सार्वभौमत्व, शिवशंकरापेक्षां तसूभरही कमी नाहीं, ह्याची जाणीव जळत्या जिवाला, अखेरची सोबत करणाऱ्या शोकाकुल जनसंमर्दाला, अहोरात्र देत असतो ! रेल्वेचं फाटक उघडणारा नि बंद करणारा दरवान, आपल्या हातीं स्वर्गाच्या महाद्वाराच्याच सुवर्णकिल्ल्या आहेत ह्य आविर्भावानें, विडीच्या थोटकाचे झुरके सोडीत, समोरच्या माळाकडे शून्यपणें पाहात बसलेला असतो ! सर्वांची अडवणूक करीत !

पण ... पण ... ! आम्हांला महत्त्व नाहीं ! नि शास्त्रानें जें दिलं, तें भलत्याच क्षेत्रांत ! मानवी जीवनाची इहलोकींची यात्रा संपल्यावर, पिंडदानाच्या वेळीं, आम्हीं हजेरी नाहीं लावली, तर गैरसमज होऊन, स्वर्गात गेलेले पितर असंतुष्ट आहेत, अशी शोककर्त्यांची समजूत होते.

कृतघ्न मानवजातीवर उपकार करण्याकरतां आम्ही जाऊं नये तिथें जातों नि तें अशुभ कदन्न खाऊन असंतुष्ट आत्म्यांना शांति देण्याचं महत्कार्य, बारा महिने अठरा काळ करीत असतों !


ह्या सेवेचं, समाज-सेवेचं फळ काय म्हणाल, तर पिंडदानाची अशुभ क्रिया नि आमचं आगमन, ह्यांची होणारी अशुभ सांगड ! अशी सांगड, कीं अंतर्मनांत आमचं एऱ्हवींचं आगमन स्मशान-भूमीचीच सर्वांना आठवण करून देतं ! यमराज्याच्या ह्या यमपुरींत ही एवढी अखेरची पवित्र सेवा करूनही, आमच्या वांट्याला येतो फक्त तिरस्कार नि जोडीला घृणा !

पिंडदानाच्या वेळीं, तेराव्या दिवशीं, मंडळी आमची चातकासारखी वाट पाहातात ! आम्हांला लाजवील अशा कर्णकर्कश आवाजांत, आमच्याच वाणीची खोटी नक्कल करून आम्हांला पाचारतात ! नि त्यांचं काम झालं, कीं खिरीवर हात मारतात ! मातेच्या वा पित्याच्या निधनाच्या स्मृतीचा खारटपणा मग खिरीच्या माधुर्यांत लुप्त होतो. समोर बसून आम्ही हें विरोधात्मक दृश्य कुतूहलानें बघत असतों ! कंठरव करीत ! मग एखादा दांडगट आम्हांला हाकलून लावतो !

आयुष्यभर हें असंच ! अपयशी पुरुषाची उपेक्षा, नैराश्य नि कारुण्य आमच्या नशिबीं ! एक गोड शब्द नाहीं ऐकत आम्ही आयुष्यभर ! आमच्या प्राणप्रिय अंड्यापासून माणूस म्हणे काजळ करतो व आपले नेत्र आमच्या पिलांच्या बल्कापासून केलेल्या द्रव्यानें शांतवितो ! देवा, आपण माणसाच्या डोळ्यांत अंजन केव्हां घालणार !

म्हणींतही आमचा अपघातच ! काय, तर म्हणे, कावळा बसायला नि डहाळी मोडायला एकच गांठ ! जास्त शहाणे म्हणतात, " काकतालीय न्यायेन । "

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शा
नोंद दि.



# गजेंद्राला हवा कपाळमोक्ष !

बाप्पा, काय केलंत हें ? एवढा अगडबंब देह मला अर्पण करून माझी जन्माची खोड मोडलीत ! ज्याला मुंगी होऊन साखर खावीशी वाटते, त्याला हें असं ! लोकांचा खेळ होतो-पण माझा जीव जातो !

माझ्या देहाच्या घडणींत आपण जबरदस्त काटकसर केली असतीत, तर कांहींसुद्धा बिघडलं नसतं देवा ! व्याघ्रसिंहांचे देह अजस्त्र थोडेच आहेत ! पण मलाही ते भारी पडतातच ना ?

आपण मला असं कां बरं घडवलं असेल ? नद्यांचा गाळ सजीव करून तर आपण मला जन्माला घातलंत नाहीं ? आषाढांतले कृष्णमेघ

गोठवून तर आपण मला बनवलंत नाहीं ! ओसाड पर्वतावरील काळ्याकभिन्न शिळांत प्राण ओतून तर मला जन्म मिळाला नाहीं ना ?

नि एवढं हें अजस्र देहाचं धूड, म्हणजे चालींत मंदपणा आलाच ! हत्याहत्यानें पावलं टाकतांना माझी मलाच लाज वाटते ! ती हरिणी पाहा कशी वाऱ्याला कापीत, काळविटाला चुकवीत, रामाच्या बाणाच्या वेगानें सुसाटत चालली आहे ! जणूं निखळलेली चांदणीच ! इवल्याशा लालसर तोंडांत चिवटपणें धरलेला कोवळा, लुसलुशीत पाला कोंबून तो पाहा पांढरा शुभ्र ससा, सजीव झालेल्या कापसाच्या गोळ्यासारखा टुण्टुण् उड्या मारीत चालला आहे ! ह्या गतिमान्, सचेतन, धावत्या प्राणीसृष्टींत मी मात्र कासवासारखा, अक्षरशः खायला काळ नि भूमीला भार !

बुद्धिदात्या गजानना, प्राण्यानें नसावं एवढं आपण मला बुद्धिमान् केलंत ! तें दूरदृष्टीनें आपल्याच सोयीकरतां का ? त्यामुळें माझ्या अंतःकरणाचा केवढा भयंकर दाह होतो, ह्याची आपल्याला कल्पना आहे का देवा ? असामान्य बुद्धीचा एखादा नरपुंगव, ज्याप्रमाणें एखाद्या सामान्य कचेरींत टपाल रवाना करण्याचं काम वर्षानुवर्षे करीत असतो, तस्संच ह्या जंगलाच्या आडोशाला, पाला ओरबाडीत, मी माझं जीवन कंठीत असतों ! माझं मुखकमल गजाननाला दिलंत खरं, पण त्या शब्दसृष्टीच्या ईश्वरानें आम्हांला मात्र मूकस्तंभच करून ठेवलंन् ! विचारांचं थैमान गंडस्थळांत अहोरात्र चालतं नि मग बेभान होऊन, वृक्षांना धडका मारून, उसाचीं कांडीं उपटून काढावीं, तसें त्यांना आम्ही उपटून काढतों ! कारण ? कारण कांहीं नाहीं !

आपला लाडका मानव अहोरात्र संहारच करीत असतो. अगदीं बुद्धिपुरस्सर. कांहीं कारण असतं का त्याला ? निसर्गाचं एकेक रहस्य तो जसजसं उलगडतो, तसतसा तो जास्त पिसाळतो नि देतो धडक एखाद्या

शेजारच्या राष्ट्राला ! नि आम्ही जशीं झाडं उपटतों, तशी तो तिथली जनता !

संभाजीराजांसारखे लोखंडी सांखळ्यांनीं जेरबंद झालेले आम्ही .लाकडं वाहातों ! मस्तकावर माणूस, अंकुशधारी माणूस ! देवा, आपण संयमाचा अंकुश मानवाच्या मस्तकावर केव्हां बरं हाणणार ?

ढगाएवढ्या देहाला चांदणीएवढे डोळे ! हें प्रमाण तरी काय ? सुपाएवढे कान ! माशाच पाल्वायला काय ? एकावर एक ठेवलेल्या चार उखळांएवढे पाय ! सौंदर्याची कोण ही पायमल्ली ?

देवा, सागराच्या अफाट् विस्ताराला कांहीं अर्थ आहे ! अनंत अवकाशांत ब्रह्मांड सांठवलेलं आहे ! पण माझ्या ह्या विशाल देहांत फक्त पालापाचोळाच. एवढ्या मोठ्या प्रचंड वजनाला सचेतन ठेवण्यासाठीं केवढी मोठी प्राणज्योत लागत असेल बरं ! चैतन्याचा केवढा बरं हा दुरुपयोग ?

आपण मला शक्तिमान् केलंत ! महाशक्तिमान् ! ‘अभक्ष्य’ न सेवणाऱ्याला एवढं मोठं आमिष कशासाठीं ? ससा नि बकरं त्यांतं तेंच तर आमचं खाद्य ! मग कां एवढी शक्ति ? आपल्या वैचित्र्याचे लाड पुरवण्यासाठीं आपण फारच मोठी किंमत दिलींत देवा !

प्राणीमात्राला शक्ति देऊं नये ! मस्ती फार येते त्यामुळें ! बुद्धि नि शक्ति ह्यांचा अशुभ मिलाफ म्हणजे मानव ! पाहिलेत ना माणसानें काय काय उपद्व्याप चालवले आहेत ते ? आम्हीं आपली झाडांझुडुपांवरच धडक मारतों ! माणसांची धडक चंद्रावर ... शुक्रावर ... खगोलाबाहेर, सर्वत्र ... माणसाच्या बाहेरख्यालीपणाचा हा तर राक्षसी आविष्कार !

माणसाला एवढं प्रबळ केलंत, त्याला आतां उपाय नाहीं देवा ! पण देवा, माझा पाय सुसरीच्या जबड्यांत अडकवून आपण मला आपला धावा करायला लावलंत नि मग माझी सुटका करून आपण माझी मोठीच पंचाईत करून ठेवलीत ! जरा कुठें शक्तीची मिजास मीं कधींकाळीं मारलीच,

तर इतर प्राणी गालांतल्या गालांत हसत म्हणतात, “ हॉं ! हॉं ! माहीत आहे ! माहीत आहे ! पण ... पण ... त्या सुसरीचं काय झालं हो गजराज ? ”

त्या सुसरीचं चांगलं ठीक चाललं असेल हो ! पण ... पण आमचे दिवस मात्र फार वाईट आले आहेत देवा ! सर्व संस्थानं झालीं विलीन ! गुलहौशी राजेमहाराजे गेले बिचारे ! गजलक्ष्मी रुसली नि गजराजही मलूल, दीन झाले बिचारे ! दसऱ्याच्या खाशा स्वारीच्या वेळीं ज्यांच्या देहावर सोन्याच्या अंबाऱ्या झुलायच्या, ते वाहातात आतां पी. डब्ल्यू. डी. ची खडी ! ज्यांच्या गंडस्थळांवर चंदनी लेप लागायचे, त्यांना धुतात आतां सांडपाण्यानें ! सागवानी ओंडके उचलायचं सुखही फारसं नशिबीं रहिलेलं दिसत नाहीं ! यंत्रं करतात तींही कामं कुठें कुठें !

म्हणून म्हणतों देवा, आमचा आतां उपयोग तरी काय ? आमच्या दंत-संपत्तीसाठींच ना ? छान, चांगलेच दांत पाडलेत आमचे !

देवा, हें हस्तीयुग नाहीं ! अणुयुग आहे ! आतां सगळं लहान लहान हवंय् ! जितकं थिटं ... जितकं थिट्ठकलं, तेवढं आधुनिक ! अणूसारखं अदृश्य असेल, तर फारच उत्तम ! घर लहान, अंगण लहान, खोल्या लहान, ताट लहान, वाटी लहान, पाट लहान ! सारं कसं अगदीं लहानच लहान ! लघुत्व हाच आजचा स्थायीभाव ! माणुसकीचं आधुनिक लघुत्व, आजच्या अणुयुगांतूनच जन्माला येत आहे देवा ! कणामुळें रण माजणार आहे ! कणानेंच रण करणार आहेत !

तिथें मग आमच्यासारख्यांचा काय बरं उपयोग ? अश्मयुगांतले अनेक अजस्र प्राणी उपकारकर्त्या काळानें आपल्या प्रचंड उदरांत रिचवले नि पचवले ! आम्हांलाही करा एकदम स्वाहा नि द्या एकदा मुक्ति ! सोडा त्या सुसरी नि धावूं मात्र नका आमच्या मदतीला ! मग हस्तिदंत पार गेलं, कीं सारं जग आपले दांत दाखवील !



# ढेकणासंगें....

गजराजासारखा जर का माझा देह अफाट नि प्रचंड असता, तर सर्व माणसांना मीं पायांखालीं तुडवलं असतं नि आमच्या वंशजांना युगानुयुगें पायदळीं तुडवणाऱ्या मानवप्राण्याचा मीं एक रक्तबंबाळ नि घनघोर असा सूड घेतला असता. पण देवा, नाचणीच्या दाण्याएवढा देह मला आपण अर्पण केलात. जगण्यासाठीं फक्त. पण जगण्यासाठींच मग मला अनेक क्लृप्त्या वापराव्या लागल्या !

वास्तविक माझा पिंड अहिंसक आहे. माणसाच्या अंगीं रक्ताऐवजीं नीरा असती, तर तीच प्राशन करून मी जीव धरून बसलों असतों. पण

ह्या दोन पायांच्या बुद्धिमान् जनावरांना आपण भरलंत तें रक्तानें ! रक्तशोषण करणं हा वास्तविक आमचा धर्म नव्हे ! तें महत्कार्य नि त्याची राखीव मक्तेदारी काळाबाजारवाल्यांची नि अप्रामाणिक व्यापाऱ्यांची ! पण हाय ! नाइलाजानें, देवा, अगदीं नाइलाजानें आम्हांला हें रक्तरंजित अतिक्रमण करावं लागतं. ह्या इवल्याशा देहासाठीं !

खरं म्हणजे, आम्हीं पुष्ट मानवाचं रक्तशोषण करावं, अशीच आपलीही धारणा असावी. म्हणूनच हा एवढा क्षुद्र देह ! त्या देहाचा रंगही मातींत, मळक्या गादींत नि रंगीत कोटांत सुलभपणें झाकला जाण्यासारखा ! कुठल्याही फटींत दडी मारण्याची सोय ! शत्रूनें चिमटींत चुकून पकडलंच, तर जगण्याची पावनखिंडी जिद्द ! गनिमी काव्याचा प्रादुर्भाव आमच्यापासूनच झाला असावा, अशी आमची समजूत असली, तर त्यांत काय वावगं आहे ?

माणसाला पृथ्वीचं घडणारं दर्शन जेवढं भव्य असेल, तेवढाच माणूस आम्हांला भव्य दिसतो. दाण् दाण् पावलं टाकीत तो चालायला लागला, कीं पर्वतच सचेतन होऊन हालूं लागल्यासारखा वाटतो ! एवढ्या पहाडी, धिप्पाड माणसानें आमच्यासारख्या पामरावर आपलीं बोटं त्वेषानें चेपावीं, ह्यापरता दैवदुर्विलास कोणता ? जरा मोठे असतों नि मुखांत सुळे असते, तर सर्व मानवांचे हात, शाहिस्तेखानाच्या हाताशीं स्पर्धाच करीत राहाते !

आमची ही इवलीशी पत ! तिलाही जबरदस्त धक्का दिला तुकोबारायांनीं ! “ ढेंकणासंगें हिरा जो भंगला ! ” म्हणजे देवा, पाहा काय न्याय आहे तो ! भंग होतो पदोपदीं आमचा आणि काठिण्यमूर्ति हिरकणीची तक्रार मात्र आमच्यासारख्या क्षुद्र जंतूविरुद्ध ! उरफाटेपणा हाच जीवनाचा स्थायीभाव असतो कीं काय कुणास ठाऊक ? आपण निर्माण केलेल्या जीवसृष्टींत आम्हांला जन्म देण्याचं कांहीं प्रयोजन होतं,

असं आम्हांला वाटत नाहीं! अनावश्यक असे कोटि कोटि जिवाणूं निर्माण करून, आपण ही विश्वव्यापक जडणघडण उगीचच गुंतागुंतीची करून ठेवली आहे! आमच्यासारख्यांच्या तोंडीं वास्तविक हें असलं कांहीं शोभत नाहीं हें खरं! पण ... पण ... लहानतोंडीं मोठं बोलतों झालं!

जगाचा गुंतावळा मोठा करून हें प्रकरण थांबतं, तरी आमचं कांहीं म्हणणं नव्हतं! सृष्टिनिर्मिति करण्याच्या अतिउत्साहामुळें आपल्या निर्मितीला सीमाच राहिली नसावी! पण ह्या प्रचंड व्यापाच्या खाण्यापिण्याची समस्या? अन्न कमी म्हणून प्राण्यालाच प्राण्याला खायला लावलंत आणि लायक तेच जगतील, असा भयानक सिद्धान्त निर्माण करण्याची संधि रक्तशोषक माणसाला दिलीत!

हूँ! म्हणे लायक तेच जगतील! खरं म्हणजे नालायक तेच जगतात! हिंसेनें! पशुबलानें! म्हणूनच तर व्याघ्राचे अणकुचीदार सुळे गाईच्या लुसलुशीत मानेंत घुसतात! म्हणूनच तर सिंहराज गंडस्थळ फोडतात! म्हणूनच तर नागराज बेडूक मटकावतात! का ह्या सर्वांचं एकमेकांशीं वैर असतं?

जीवनचक्र नीट सुरळीतपणें, अव्याहतपणें फिरत राहावं, म्हणून आपण जर ही परस्परसंहाराची योजना केली आहेत म्हणावं, तर मूळ मुद्दा राहातोच. नि तो हा, कीं आपण हा व्याप एवढा उगाच वाढवलात! आपला विश्वव्यापी खेळ झाला, पण आमचा, अखिल प्राणीसृष्टीचा मात्र जीव गेला नि सारखा जातोच आहे!

पण देवा, आम्हांला उपजत थोडी विनोदबुद्धि आहे, हेंही नसे थोडकें! त्यामुळें हें शोषक जीवन सोशिकपणें व्यतीत करीत असतां, आम्हांला विरंगुळा मिळतो, तो एका विचित्र परिस्थितींतच!

एकाच घरांत पसरलेल्या बिछान्यांवर जरी आम्ही पाळीपाळीनें दबा धरून बसलों, तरी वेगवेगळ्या खोल्यांतून नि एकाच कुटुंबांतल्या माणसांकडून, एकमेकांविषयीं असं कांहीं अपरोक्ष नि परोक्ष ऐकायला मिळतं देवा, कीं आमच्या कर्णेंद्रियांचीं छिद्रंच बुजतात! आम्ही काय पाहात नाहीं नि काय ऐकत नाहीं!

एकमेकांना फसवून, वर प्रेमाचं खोटं नाटक कुशलतेनें रंगवणारीं तरुण युगुलं, सासूचा मृत्यु लवकर व्हावा म्हणून देवापाशीं हात जोडून प्रार्थना करणारी सूनबाई! सूनबाईचा नक्षा उतरावा नि बाळंतपणांत ती अगदीं खलास व्हावी, अशी राक्षसी लालसा हृदयाच्या कोपऱ्यांत सांठवून ठेवलेली कजाग, वृद्ध सासू! वाढलेलं ताट रागानें भिरकावून देणारा सासरा नि बाहेर जाऊन मग विश्वबंधुत्वाची शिकवण देणारी त्याची नाठाळ वडबड! भावाभावांत कलह निर्माण करणाऱ्या दोन वेगळ्या घरच्या जहांबाज, घरफोड्या जावाजावा! म्हाताऱ्याच्या मृत्युपत्राकडे आशेनें डोळे लावून बसलेले कन्यापुत्र! अनंत प्रकार!

दारं, खिडक्या बंद झाल्या, तरी आम्हांला कुणाचा, कुठेंच मज्जाव नाहीं! आम्ही आपले बेधडक इकडून तिकडे जातों नि रक्तशोषण करतां करतां मानवी जीवनांतल्या असल्या विविध रसांचं सेवन असं चोरून करतों. भोजन मनसोक्त झाल्यावर एखाद्या उशीच्या सांदी-कोपऱ्यांतच मग डोळा लागतो आमचा! पहाटेचा तोच थंडगार, शीतल वारा उशीवरील नि उशीखालील जिवांना शांतवीत असतो.

विरंगुळा हाच काय तो एक! भिंतीला कान तसे गाद्याउश्यांना आम्ही! पण देवा, किती हें लाजिरवाणं जिणं! दुसऱ्यांच्या नुसत्या चहाड्याच ऐकायच्या! त्यापेक्षां आम्हां सर्वांना नणंदाच केलं असतंस तर!



# जंगलचा राजा

"तो माणूस म्हणजे मात्र सिंहासारखा बरं का !" असा कुठल्या माणसाविषयीं केलेला उल्लेख माझ्या कानीं पडतो, तेव्हां मला मनस्वी दुःख होतं !

अपवाद छत्रपति शिवाजी, संभाजी राजे, लोकमान्य टिळक नि स्वातंत्र्यवीर सावरकर ! ते खरे केसरी ... नरकेसरी ! इतरही नरकेसरी अगदींच नसतात असं नव्हे ! पण त्यांच्या सिंहपणांत, सिंहपणापेक्षां कोल्हेकुईच जास्त असण्याचा अगदीं दाट संभव असतो !

ॲण्ड्रोक्लीसनें त्या सिंहाच्या पायांतून तो कांटा काढल्यापासून माणूस आमचा कांटा काढण्यास अक्षरशः सरसावला आहे. आमच्या

जन्मजात पराक्रमाला गालबोट लावण्यासाठीं त्यांनीं इसापनीतींतल्या गोष्टींत, उंदराकडून आमची सोडवणूक करून घेऊन, आमच्या मानबिंदूवर आपल्या अणकुचीदार दांतांनीं दंताघात केले! आम्हांला खजिल करण्याची केवढी ही कारवाई? केवढा हा भारभाईचा कट? ज्याचं साम्य फक्त कोल्ह्याशींच जास्तींत जास्त आहे, अशा मानवाची तुलना माझ्याबरोबर केल्यानंतर संतापानें मी माझी आयाळ घुसळवितों ती ह्याचमुळें!

निसिंह पृथ्वी करण्याची जणूं कांहीं शपथ घेऊन दोन पायांचे कोल्हे आमचा निःपात करण्यासाठीं जवळ जवळ जगभर चेकाळले आहेत. जिथें जिथें म्हणून आमची वस्ती असेल, तिथें हे आपले हजर! संस्थानांतल्या राजांना खालसा करून ह्यांची तृष्णा भागली नाहीं म्हणूनच कीं काय, जंगलच्या राजांचीही लांडगेतोड करण्यासाठीं हे आतां सज्ज झाले आहेत.

देवा, राजा हा क्षणाचा राजा आणि अनंत काळाचा सामान्य माणूसच असतो! जंगलच्या घनदाट साम्राज्याचं सार्वभौमत्व आम्हांला बहाल करून आपण एक वेगळा विनोदच निर्माण केला आहे माझ्या बाबतींत! अरण्यांतला टिपू सुलतान म्हणजे व्याघ्रराज! आमचे मांडलीक खरे! पण महत्त्वाकांक्षा नि जिद्द मोठी! आमच्या आयाळीचीं छत्रचामरं करून तीं आपल्या पिवळ्या, पट्टेरी मस्तकावर हत्तीच्या सोंडेनें ढाळलीं जावींत, ही अंतर्यामींची खरी तळमळ नि इच्छा. पण त्याचं गाऱ्हाणं आपण नामंजूर केलंत! परंपरेनें नि संप्रदायानें जंगलच्या राज्याची सुवर्णमुद्रा नि सर्वाधिकार आम्हांला दिले गेले नि राजाराममहाराजांसारखे अडचणींत सापडल्यामुळें आम्हीं त्यांचा स्वीकार केला.

राजवस्त्रं अंगीकारतांना आमची भूमिका स्थितप्रज्ञ राजयोग्याची होती नि आहे! आम्हीं आमच्या अखत्यारांत रामराज्य निर्माण केलं

होतं. आमचा लौकिक वाढला ! रत्नखचित सिंहासनावर आरूढ होणारे नृपतिसुद्धा आमचा मुखवटा, त्या सिंहासनाच्या हात ठेवण्याच्या जागेवर, आमच्याविषयींचा मान दर्शवावा म्हणून, कसबी कारागिरांकडून काढविते झाले ! सिंह म्हणजेच राजा, सिंह म्हणजेच सार्वभौमत्व, सिंह म्हणजेच अनियंत्रित सत्ता, सिंह म्हणजेच पराक्रम, सिंह म्हणजेच राजघराण्यांतली खानदानी, असं समीकरण समाजांत रुजलं नि पक्कं झालं !

ह्या लादलेल्या मोठेपणामुळें आमची स्थिति मात्र केविलवाणी झाली. डौलांत, डुलत चालतांना इतरांना पाहायला ठीक वाटतं, पण आम्हांला त्रास होतोच ! सन्मान्य व्यक्ति मोठ्या रुबाबांत चालतात ! ताठ ! छाती पुढें काढून ! पण त्याचे शारीरिक कष्ट किती ह्याचा कुणीं विचार केला आहे का ?

आमच्या आयाळीचं जंजाळ सिंहासनावरल्या आमच्या मुखवट्यांवर जरी शोभिवंत दिसत असलं. तरी अजागलस्तनासारखी त्याची अवस्था आहे, असं आम्हांला मात्र वाटतं ! त्या मानानें व्याघ्रराजाच्या बाबतींत मात्र पक्षपात केलात हं देवा ! केसांचं अवडंबर जबड्याभवतीं नसल्यामुळें व्याघ्रराज दिसतातच मुळीं संतप्त सेनानीसारखे ! सारखे आपले तलवार परजणारे ! आम्ही दिसतों जुन्या काळच्या राजांसारखे ! सशस्त्र पण अहिंसक !

राजा हा परमेश्वराचा एक अंश आहे, अशी एक जुनी समजूत आहे म्हणे ! तसं असेल, तर आम्हीं तो अंश हुडकून काढायचा प्रयत्न केला ! पण व्यर्थ गेले श्रम ! बांधलेल्या म्हशींवर आम्ही वाघाच्याच चापल्यानें उडी मारून पुढचं सारं त्याच्यासारखंच आटोपतों ! मांसाचे लचके चवीनें खातां खातां मग असं वाटायला लागतं, कीं तो दैवी अंश बहुतेक आमच्या आयाळींतच असावा ! जंगलचा राजा नि हें केसांचं जंगल ! ह्याच जंगलांत दडला असावा तो दैवी अंश !

देवा, दुसरं असं, कीं हा राजजन्मच आम्हांला मोठ्या अडचणींत टाकीत असतो. इतर प्राणी कांहींही, कुठेंही नि केव्हांही खात असतात. मृत जनावराचं मांस सेवन केलं, तर आमच्या इभ्रतीला धक्का बसतो म्हणे ! इथें मात्र आम्हांला पांढरपेशा समाजांतल्या कर्त्या पुरुषांचं दांभिक वागणंच अनुसरावं लागतं ! परवडत नाहीं, पण परवडतं असं भासवावं लागतं ! डोळ्यांत आंसूं आले असले, तरी महागाईची झळ इतरांना ... आम्हांला कसली, ह्या आविर्भावाचा मुखवटा सतत पेहेरावा लागतो !

आणि ही सर्व फुकट फौजदारी करून, श्रेय तरी मिळतं का आम्हांला ! आम्ही आतां नुसते सत्ताधारी राजे राहिलों आहोंत. मानवी हत्त्येमुळें संख्या सारखी घटत चालली आहे. हें थांबलं नाहीं, तर आम्ही राहूं ते फक्त म्युझियममधल्या काचेच्या पेटींत, पेंढ्यानें भरलेल्या अवस्थेंत, नाहींतर मेट्रो गोल्डविन मेयर कंपनीच्या चित्रपटाच्या सुरुवातीला नुसती डरकाळी फोडण्याच्या अवस्थेंत ! थोडे फार भाग्यवान जगतील आपलं लाजिरवाणं जिणं सर्कशींत ! हत्त्येच्या शास्त्रांत दोन पायांच्या जंबुकांनीं अपरिमित प्रगति केल्यामुळें, वैयक्तिक पराक्रमाला आतां अर्थच नाहीं राहिला ! एखादा ससा, भारी असलेल्या बंदुकीनें आमची हत्त्या अगदीं सहजगत्या करूं शकेल ! आजच्या ह्या अणुयुगांत आमची प्रचंड वैयक्तिक ताकद हा एक केविल्वाणा विरोधाभास आहे देवा !

आजचं युग आहे चापाचं नि चापल्याचं ! चाप आधीं ओढील तो जग जिंकील ! ज्या समाजांत चापल्य सळसळेल, तिथें लक्ष्मीचीं सोनपावलं उमटतील ! रामाचं चाप आज निरुपयोगी ! तें आज वापरलं, तर देशाला कायमचं चूपचाप बसायची पाळी यायची ! समाज झाला आहे मदनचापानें विद्ध ! त्याला सिद्ध करायचा आहे ! आपण तर बुवा अगदीं हात टेकले ! गिरफदार केलेल्या संभाजीमहाराजांसारखीं

पावलं टाकीत आम्ही विचारमग्न अवस्थेंत येरझारा घालतों ! उद्यांचं चित्र आम्हांला तरी भयाण दिसत आहे ! जंगलचं नि शहरचं, दोन्ही राज्यं कोलमडून एक नवीनच कांहींतरी निर्माण होईल आणि कोल्होबा त्या सार्वभौम राज्याचे अनभिषिक्त राजे होतील, असं आमचं अंतर्मन आम्हांस सांगत आहे ! तसं होईपर्यंत आम्ही मात्र आमचं ढोंग चालूच ठेवणार आहोंत, दुय्यम मध्यम वर्गातल्या कर्त्या पुरुषाच्या चिकाटीनें ! जय जम्बूक ! जय जम्बूक ! !



# ज्याच्या हातीं ससा....कीं

भीते हा आमच्या साम्राज्याचा स्थायीभाव आहे. थरथर कांपणं हा आमचा स्वभावधर्म! पलायनवाद हा आमच्या तत्त्वज्ञानाचा गाभा! थरकांप साकार होऊन आमच्या रोमरोमांत भिनलेला! देवा, अशा ह्या निरुपद्रवी, भित्र्या, घाबरट, भेकड प्राण्याला जन्म देऊन आपण काय साधलंत, हें समजणं आमच्या बौद्धिक उड्डाणापलीकडचं आहे! पण आमच्या दृष्टीनें आपण ही एक फार मोठी चूक केली आहे, असं आमचं आपलं प्रामाणिक मत आहे.

शारदीय चांदण्याच्या रात्रीं, कापसाच्या ढिगाऱ्यासारख्या धवल मेघांच्या मालिका विखुरतात. त्याच वेळीं धरतीवरल्या सप्तसागरांच्या

पृष्ठभागांवर शुभ्र फेस खळबळत असतो. हिमालयाच्या गगनचुंबी शिखरांवर स्फटिकासारख्या हिमाच्या राशी पसरलेल्या असतात! ह्या साऱ्या शुभ्रतेंत, स्मशानांतली पांढरी रक्षा नि जात्या जिवांचे होणारे पांढरे डोळे ह्यांचा पांढरटपणा मिसळूनच आपण आमचा देह सजविला असावा!

एवढं करुन आपलं समाधान झालं नाहीं म्हणूनच कीं काय, आपण आम्हांला स्वरूपसुंदर केलंत! रमणीय रमणींच्या जीवनांतली संकटपरंपरा जशी त्यांच्या वेडलाव्या सौंदर्यांतून जन्मते, तद्वतच आमचा हा तेजःपुंज शरिराचा धवल गोंडा हत्त्याप्रिय मानवाला एकसारखा आकृष्ट करीत असतो! त्यांतच आमचा मृत्यु! सौंदर्यामुळें मृत्यु! आम्ही जर साळूसारखे कुरूप असतों तर? लुसलुशीत पाल्याचे चार तोबरे सुखानें चघळले असते. देवा, तेवढं कुठलं आमचं नशीब!

सौंदर्य नि कुरूपता हीं सापेक्ष असतात म्हणतात. शब्दांची मानव-निर्मित मल्लीनाथी आम्हांला उमजत नाहीं देवा! माणूस सापेक्षतावादाच्या नुसत्या लंब्या गप्पा मारतो! वास्तविक एकच त्याचा ध्यास, एकच छंद! नि तो म्हणजे अपेक्षावाद! लालसावाद! भोगवाद! कापूस पिंजावा तसा माणूस शब्द पिंजतो आणि ह्या काथ्याकुटीला, खरं म्हणजे शब्दकुटीला, म्हणतो तर्ककर्कश बुद्धिवाद! हूँ! सत्य लपवून ठेवण्याचे, दडपून ठेवण्याचे, डावलून टाकायचे, हे तर राजमार्ग!

कोवळ्या पाल्याचं सात्त्विक अन्न खाऊन आम्ही चांगले लुसलुशीत होतों. उन्हाची तिरीप लागूं नये, म्हणून झुडुपाखालीं, कपारीच्या आडोशाला, आमचा डोळा लागतो. प्रच्छन्नपणें सरसरणारा रानवारा अंगाईगीत गात असतो. दूरवर एखाद्या खळखळणाऱ्या निर्झराचं पार्श्वसंगीत आमच्या थकलेल्या इवल्याशा जिवाला जोजवीत असतं नि अशा त्या सुरम्य, निसर्गरम्य, शांत वातावरणांत एखादा काळाकभिन्न माणूस आमचा यम बनून अखेरची काळझेप आमच्यावर अनपेक्षितपणें घालतो!

'काळाची रे उडी, पडेल बा जेव्हां' ह्याऐवजीं 'मानवाची उडी पडेल बा जेव्हां' अशी उक्ति आमच्या बाबतींत जास्त सार्थ.

जगाचा इतिहास पाहिला, तर अश्मयुगापासून हीच आपली तऱ्हा! जो तो आपला दुसऱ्यावर उडी मारतोय्! जो तो दुसऱ्यावर डल्ला मारतोय्! जो तो दुसऱ्याला लुबाडतोय्! जो तो आपला अपहरण करण्यांत मग्न! जगाच्या व्यवहारी भाषेत ज्याला पराक्रम म्हणतात, त्यांत वास्तविक प्रबळांनीं दुर्बळांचा उच्छेद करावा, त्यांचा नायनाट करावा, त्यांना नेस्तनाबूद करावं, त्यांना बेचिराग करावं, त्यांना भुईसपाट करावं, त्यांना चारी मुंडे चीत करावं, हेंच काय तें अभिप्रेत असतं! विजेत्याची तलवार जेव्हां शत्रूला कंठस्नान घालते, नि त्याचं शिरकमल भुईवर गडगडतं, तेव्हां, त्याच क्षणीं, त्याच्या धर्मपत्नीच्या कपाळावरचा लाललाल कुंकुमतिलक एका झटक्यांत पुसला जातो, हेंही लक्षांत घ्यायला हवंच! पराक्रमाचा विजयोत्सव साजरा होत असतांना, त्या विजयोत्सवांत बेहोश होऊन सहभागी होणाऱ्यांच्या शतपट इतर, त्याच वेळीं कढवट अश्रु ढाळीत बसलेले असतात, हें विसरायला आम्ही कांहीं मानवप्राणी लागून नाहीं गेलों! समरभूमीवरच्या धर्मबिंदूंचेच अश्रु होत असतात ... विजयाचे नि पराजयाचे! आनंदाचे नि दुःखाचे!

पण आमची सहानुभूति मात्र पडलेल्याकडे! कारण त्यांची आमची जातकुळी एकच, दुबळ्यांची, निरुपद्रवी भेकडांची! पराक्रमी नसलेल्या, म्हणजे पुरेसे दुष्ट नि खुनशी नसल्यामुळें नष्ट होणाऱ्या सज्जनांची!

आणि जगांत दुबळ्यांचंच बहुसंख्यत्व नाहीं का? हाँ! त्यांच्यापाशीं सत्ता नसेल! पण सत्ताधारी प्रबळ व्यक्तींनीं सचेतन प्राण्यांना आपल्या मर्जीप्रमाणें खेळवावं हीच नाहीं का जगाची रीत! मुकीं बिचारीं कुणीही हाका! प्रजा म्हणजे मेंढरं!

देवा, जगांत बहुसंख्य दुबळे निर्माण करून आपण विषमतेचा पायाच नाहीं का घातलात? राक्षसी महत्त्वाकांक्षेनें पछाडलेल्या कांहीं नरपुंगवांच्या छन्नी हट्टासाठीं राष्ट्रंच्या राष्ट्रं पेटलीं, जळलीं, नामशेष झालीं! कुण्या सम्राज्ञीचे लाड नि चोचले पुरविण्याकरितां हत्त्याकांडं झालीं! कुणा सम्राटांच्या रक्तपिपासूपणामुळें रुधिराच्या नद्या वाहिल्या!

आमच्यावर आकस्मिकपणें झडप घालणारा मानव आम्हांला शिजवून आपले दांत मग आमच्या देहांत घुसवितो! नि आमचा रुचकर देह मट्ट करतां करतां मोठ्या डौलानें नि गर्वानें बडबडतो, "ज्याच्या हातीं ससा तो पारधी!"

चक्र परिवर्तन करीत आहे! परिवर्तन चालूच आहे. एक काळ कदाचित् असाही येईल … तेव्हां ही म्हण बदलावी लागेल, "ज्याच्या हातीं पारधी, तो ससा!" तेव्हां सशाला शिंगं फुटतील! काय होईल आणखी कुणास ठाऊक? उत्क्रांतीची प्रगति अतर्क्य आहे! त्याबद्दल फक्त तर्कच काय ते करायचे! शनिवारवाड्यासाठीं भूमि श्रीमंतांनीं पसंत केली, ती म्हणे ससा कुत्र्याचा पाठलाग करीत होता हें दृश्य पाहूनच! ज्या भूमीवरचा ससा इतका धीट, इतका आक्रमक नि इतका शूर, त्या भूमीवर प्रासाद बांधल्यास विजयश्री मिळेल, हा तर्क कांहीं खोटा नव्हता! हा विचारही लोकोत्तरच खरा! मग्राशीं आम्हीं जें सांगितलं, कीं एक काळ असा येईल, कीं सशाच्या हातीं पारधी, त्याचा हा ऐतिहासिक पुरावा खुद्द श्रीमंतांनींच ठेवून दिलेला!

देवा, आपण आमच्या बाबतींत केवढा अन्याय केलात बरं! शंकराच्या तृतीय नेत्रासारखे आमचे दोन्ही डोळे केलेत लाललाल! पण अंगारच नाहीं आंत! लालसर रंगाचे पण विझलेले कोळसे! दृष्टिभ्रमाचं नि दृष्टिविरोधाभासाचं केवढं हें लोकोत्तर उदाहरण! ∞



# वाघ म्हटला तरी ...

मारुतिरायाची खरी उपासना जर कुणीं केली असेल, तर ती आम्हींच ! भीमराजाचे खरे उपासक जर कुणी असतील, तर तेही आम्हीच ! रामदासस्वामींचं तत्त्वज्ञान अक्षरशः जर कुणी पाळत असेल, तर तेसुद्धा आम्हीच ! आम्ही शक्तीचे पूजक ! पराक्रमाचे पुजारी ! आक्रमक जीवनाचा खराखुरा आविष्कार !

आमच्या ह्या असल्या चढाईखोर, बुलंद नि मर्दानी जीवनाचे पडसाद मराठी सारस्वतांतही घुमले आहेत. " वाघ म्हटला तरी खातो नि वाघोबा म्हटला तरी खातो. " हीच म्हण घ्या वानगीदाखल! आमचा नामोच्चार होतांच अखिल प्राणीसृष्टि चळचळां कांपायला लागते !

आणि नेमकी हीच तर आमच्या जीवनाची शोकान्तिका आहे देवा ! क्रौर्याचं, खुनशीपणाचं, रक्तपिपासुपणाचं, हत्येचं आम्ही मूर्तिमंत प्रतीक ! कुणाला वाटणार आमच्याविषयीं सहानुभूति नि कणव !

देवा, आम्हांला ही अशी दहा रेड्यांची अफाट ताकद देऊन काय मिळविलंत आपण ? हल्ला करणं हा आमचा स्थायीभाव ! ह्या स्थायीभावाचे चोचले पुरविण्याकरतांच आपण हा अट्टाहास केलात ना ? पाशवी शक्तीचा केवढा हा व्यय ? अप्रबुद्ध माणसांची राष्ट्रंसुद्धा नाहीं म्हटलं तरी शक्तीचा समतोल राखण्यासाठीं शतकानुशतकें धडपडत असतात व आहेत. आपण मात्र ही मूलगामी चूक केलीत. वाईटपणा मिळतो आहे, शिव्याशाप मिळताहेत आम्हांला ! आपले आशीर्वाद, दुसरं काय म्हणायचं ?

त्यांतल्या त्यांत एका दैवतानं आम्हांला वाहन करून आमचा केवढा गौरव केला आहे ? आमच्या रक्तरंजित जीवनांत हाच किस्सा काय तो सांगण्यासारखा ! व्याघ्रांबरीला आमच्या पुष्ट पांठीवर नेतांना आम्हांला केवढा सात्त्विक आनंद होतो ? एरव्हीं आम्ही वाहातों आमच्या पाठणावर रेड्यांचे नि गाईबैलांचे मुडदे !

व्याघ्रांबरीनें निर्माण केलेल्या ह्या दैवी विरोधाभासामुळें आमची मात्र करमणूक होते आहे. निदान एकातरी दैवताला आमची बूज आहे, हें समाधान कांहीं थोडंथोडकं नाहीं.

परमेश्वरा, आपण आम्हांला एक भयंकर हिंस्र पशु केलंत ! मऊ, लुसलुशीत पोटं नृसिंहाच्या पोटतिडिकेनें फाडून टाकण्यासाठीं महाभयंकर सुळे दिलेत आम्हांला ! अक्राळविक्राळ जबडा आमचा ! यमाच्या राज्याचीं जणूं महाद्वारंच ! स्वच्छ निर्झरांत आमच्या जबड्याचं प्रतिबिंब आम्ही पाहातों, तेव्हां आमची आम्हांलाच भीति वाटते ! मग शेळ्या बकऱ्यांचं नि गाईबैलांचं काय घेऊन बसलात ?

शांत, सुंदर नि शीतल वनांत हिंसेचं राज्य आपणच निर्माण केलंत! खळखळत्या झऱ्यांत रक्ताची भळभळ आपणच कालविलीत. वेळूच्या वेटांतून शीळ फुंकणाऱ्या मंद समिराला खिजविण्याकरितां कीं काय, आपण आमची डरकाळी यमसूचक केलीत! जंगलांतून संथपणें वाहाणाऱ्या सरितेंत, लुकलुकत्या चांदण्याचं प्रतिबिंब पडतं. त्या चांदण्याच्या थरथरत्या प्रतिबिंबांत आमच्या विबळ्या, घाऱ्या नेत्रांचं प्रतिबिंब पाडून स्वर्गलोकाच्या त्या प्रशान्त समूहांत आपण भलतीच भेसळ करण्याचं औद्धत्य दाखविलंत! आटवलेल्या वासुंदीच्या मोठ्या पातेल्यांत पुंजकाभर मीठ टाकावं तस्सं!

एवढं करून आपला संतोष झाला नाहीं, म्हणून आपण आमच्या पातळ उदरांत राक्षसी भूक रिचवून ठेवलीत! आमचा जठराग्नि वडवानलापेक्षां दाहक नि भयंकर! मग हत्या हाच आमचा स्वभावधर्म असणार नाहीं का? नि ह्या निसर्गधर्माला अनुसरून आम्ही साहजिकच वागतों त्याबद्दल आपण किती कठोर शिक्षा दिलीत आम्हांला? आमच्या धर्मपत्नी जेव्हां प्रसूत होतात, तेव्हां त्यांची भूक इतकी वेडलावी होते, कीं त्या तिरमिरींत त्या स्वतःचीं अपत्यंही मटामट् खाऊन कीं हो टाकतात! भ्रूणहत्येचं पाप आपण आमच्या सहधर्मचारिणीवर लादून हा असा क्रूर वंशच्छेद कां बरं केलांत? आमच्या गृहलक्ष्मीकडे वाकडा डोळा करून पाहाण्याची अक्षरशः कुणाचीच ताकद नाहीं! मुडदा पाडतों आम्ही त्याचा! पण ... पण वाघीण असली, तरी प्रसूत होत असतांना ती कोमलांगी माताच असते ना? जीवनमरणाचा झगडा चाललेला असतो तेव्हां! अशा ह्या अतिनाजूक समयीं आपण त्यांची मातृभावना तात्पुरती सपशेल चिरडून टाकतां नि आमच्या वंशाचे बहुतेक दिवे आमच्या डोळ्यांदेखत मालवतात हो, मालवतात! आमच्या पापाचं 'प्रायश्चित्त आमच्या बछड्यांना कां हो! नि तेंही जन्मतःच!

पित्याचं प्रायश्चित्त मुलांनीं भोगायचं असतं, असा सनातन धर्माचा एक सिद्धान्त आहे म्हणे! छान! मातृत्वाची अफूची गोळी देऊन हा असा वंशनाश करणं कुटल्या धर्मशास्त्रांत बसेल तें जरा समजावून सांगा ना देवा!

आम्हांला सुधारण्यासाठीं आम्हीं कितीही प्रयत्न केले, समजा, आम्ही योगवासिष्ठ वाचीत राहिलों, निष्काम कर्मयोगाची शिकवण आचरणांत आणूं लागलों, शांतिपर्वाचीं पारायणंच्या पारायणं केलीं, 'बुद्धं शरणं गच्छामि।' चा धोसरा घेतला, मांसाहार वर्ज्य करून कोवळ्या लुसलुशीत पाल्यावरच उपजीविका करूं लागलों, गगनभेदी डरकाळ्या फोडण्याऐवजीं 'सोऽहं।' मंत्र जपूं लागलों, गरमगरम रक्ताचे घोट घेण्याऐवजीं फक्त नीराच पिऊं लागलों, तरी आमचा पुढचा पंजा समोरच्या प्राण्याला एका फटकाऱ्यांत रक्तबंबाळ केल्याशिवाय राहाणार नाहीं! वाल्या कोळ्याचा वाल्मीकि झाला, तरी वाघोबाचा तुकोबा होऊंच शकणार नाहीं! नि ह्याला देवाधिदेवा, आपणच जबाबदार बरं, आपणच!

शंभर उंदीर मारून मांजरी काशीयात्रेला जाण्याचा मनसुबा रचते. लाखों प्राणी मारून आम्ही एखाद्या पडीक देवळांतल्या देवीच्या दर्शनाला, व्याघ्रांबरीचं स्मरण करून, मध्यरात्रीच्या आसपास चोरासारखे लपत छपत कीं हो जातों! जंगलाच्या अनिर्बंध राज्यांत स्वैरपणें विहार करणारे आम्ही व्याघ्रराज हे असे लपून छपून जातों एखाद्या देवळांत! देवा, आपल्या दारींही हा असा आम्हांला मज्जाव!

नाहीं! अन्याय आहे! देवा, हा अन्याय आहे! केव्हां केव्हां वाटतं, आत्मघात करावा! डोंगरकपारीच्या एखाद्या अणकुचीदार शिळेवर कपाळमोक्ष करून घ्यावा! त्या संतापांत, त्या संमोहावस्थेंत, आम्ही मग रागारागानें जमीन उकरायला लागतों. लक्ष जातं आमच्या नखांकडे! डोळे पाणावतात! ऊर भरून येतो ... भावनेनें नि

अभिमानानें! नि आनंदाश्रु झळाळतात आमच्या विबळ्या डोळ्यांत! मृत्तिका उकरतां उकरतां लक्ष जातं आमच्या नखांकडे नि आठवतं, कीं आमच्या कुठल्यातरी पूर्वजाचीं नखं, प्रतापगडच्या त्या भेटींत त्या पोटांत घुसलीं होतीं!

सार्थक झालें जन्माचें! देवा, सार्थक झालें जन्माचें! असे वाटावयास लावणारा हाच आणखी एक दैदीप्यमान् क्षण!

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा
अनुक्रम ०१६०१ वि. ०१।०१
क्रमांक ३०२० नोंद दि. ३-३-८



# कोल्हा काकडीला राजी !

धूर्तपणा, कपटीपणा, लुच्चेपणा, ही सर्व खरं म्हणजे मानवाची मिरासदारी ! आपल्या डोईमधल्या इवल्याशा पिवळटसर बुद्धिकेंद्रांत माणूस जग बुडविण्याचं कपटनाटक एकसारखं आपलं रचीत असतो.

वडिलांच्या मृत्यूनंतर, एकाच आईच्या पोटांतून आलेले चार मुलगे, वडिलांच्या अस्थि रामकुंडांत नीट विरायच्या आधींच, पाटा-वरवंट्याचीसुद्धा वांटणी (जावाजावांच्या स्त्रीसुलभ बायकी चिथावणीमुळें) करण्यास सरसावतात. गंगेवरचं क्षौर वेगळं नि इथलं

भावाभावांचं, एकमेकांनीं केलेलं वेगळं! सासूबाईच्या एकुलत्या एक भरजरी पैठणीवरून अस्साच कल्कलाट होतो. खुंटाळीवर टांगलेलं सासूबाईच्या अस्थींचं बोचकं ज्या वेळीं, अवेळीं सुटलेल्या वाऱ्यानें हिंदळत असतं, त्याच सुमारास त्यांच्या एकुलत्या एक भरजरी पैठणीवरून सुनांचा अप्पलपोटा कल्कलाट चाललेला असतो.ज्या हातांनीं बाल्यावस्थेंत वाढवलं, भरवलं, झोपवलं, ते थरथरणारे हस्त भस्मसात् झाल्यावर स्मशानभूमींतील तो अभद्र जमिनीचा तुकडा जरा थंडावला नाहीं तोंच वडिलोपार्जित जमिनीच्या तुकड्यावरून नि त्याच्या वांटणीवरून, सख्खा भाऊ आपल्या सहोदराचं शिर विहिरीच्या तुटक्या बांधाजवळ कुऱ्हाडीनें काचकन् फोडतो !

हा असला अस्सल, इरसाल नि नंबरी स्वार्थीपणा नि लुच्चेपणा रोमरोमांत भरला असूनही माणूस मात्र मलाच म्हणतो लुच्चा ! धूर्त ! लबाड ! म्हणजे आहे कीं नाहीं !

दाट जंगलांत आम्हां जनावरांना राहावं लागतं, तें अक्कलहुशारीवर ! कोणी पंजाच्या हिंमतीवर डरकाळी मारीत डौलांत हिंडतात, तर विषभरल्या सुळ्यांच्या दटावणीनें सर्वांना दबवितात ! कुणी अंगांतूनच रामबाण मारतात, तर कुणी वाऱ्यासारखे पळतात ! माझ्याकडे तसं खास कांहींच नाहीं ! इमानीपणाचं, प्रेमळपणाचं नि खरं म्हणजे लाळघोटेपणाचं कंत्राट श्वानराजाकडे दिल्यामुळें मला जें जगावं लागतं, तें माझ्या हिकमतीवर ! अक्कलहुशारीवर !

शरीरधर्म कुणाला चुकलाय् ? ज्याचं जें खाणं तें तो खातोच ! निसर्गाची सांखळी बांधली आहे मोठी छानदार ! सारासार विचार करून, पुढचा मागचा विचार करूनच, मी विहार करीत असतों. इवलासा माझा पंजा जमिनीवर टेकतांना पंजाखालीं जें आहे, तो पिवळा खडा, कीं नागाच्या पिल्लाचं डोकं, ह्याची खात्री करुनच सावधानतेनें मी चालतों.

रामदासस्वामींच्या दासबोधांतला कांहीं भाग माझ्यावरच लिहिला असावा, असं मला आपलं वाटतं !

'सावधान असावें।' हा त्यांचा उपदेश माझ्याइतका आजवर कुणींच पाळला नसेल. आमच्या धसमुसळ्या, दांडग्या, आक्रमक विश्वांत सदाशिवराव भाऊच फार ! ही ऽ भाऊ गर्दी ! आमच्यासारखे अहमदशहा अब्दाली क्वचितच ! एवढी एकच चांगली गोष्ट, देवा, आपण चुकून आम्हांला दिली नसतीत, तर मात्र थोडं फार अल्पायुष्य जें भोगतों, तेंही मिळालं नसतं !

लांडीलबाडी नि लुच्चेपणा हे वास्तविक माझे स्थायीभाव नव्हेतच ! झाडांझुडपांतून जीवन व्यतीत करतांना मावळ्यांचा गनिमी कावा वापरून मी माझी फत्ते करीत असतों ! देवा, लहान तोंडीं एवढा मोठा घास वास्तविक घेऊं नये मीं ! पण ... पण ... आतां राहावत नाहीं ! आपल्या स्वर्गीय राज्यांत, मानवांनीं आमच्यावर लादलेल्या त्या गुणाचा केवढा बरं सुळसुळाट ?

जगाचा आजवरचा सर्व इतिहास म्हणजे लांड्यालबाड्यांचा एक अफाट महाग्रंथच नव्हे का ? सार्वभौम राजांचे खून त्यांच्या मंत्र्यांनीं केले ! त्याला म्हणतात सत्ता बळकावली ! राजाचा खून केला, म्हणजे सत्ता बळकावली काय ? हूण आले, तार्तर आले, रानटी टोळ्या आल्या ! कशाला ? लुटायला ! ! त्याला म्हणायचं देश जिंकायला ! युद्धांत कायदेशीर खून करायचे ! खून करणाऱ्याला योद्धा म्हणायचं नि ज्याचा मुडदा पडतो, त्याला हुतात्मा म्हणायचं ! 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गम् । ' वा ! म्हणजे बिछान्यावर आटोपला तो भागूबाई ! नि दुसऱ्याला मारतां मारतां मेला तो रणवीर काय ? दुसऱ्याचा देश जिंकला, साम्राज्य स्थापलं, तिथल्या जनतेला लुटलं, जाळपोळ केली, दग्धभूमि केली, ह्या सर्व राक्षसी अत्याचारांना म्हणायचं विजिगीषु वृत्तीचा आविष्कार ! इतिहासाचीं

पानं रक्ताच्या लालभडक शाईनें लिहून काढायचीं नि हाणामारीच्या ह्या रक्तरंजित कथेला म्हणायचं सोनेरी अक्षरांत लिहून ठेवावा असा इतिहास ! लाखों लोकांचे मुडदे पडतात, लाखों कपाळांवरचे कुंकुमतिलक पुसले जातात, लाखों वंशदीप कायमचे विझतात, तेव्हां कुठें इतिहास लिहिण्यायोग्य ती भारी किंमतीची शाई तयार होते ! देवा, मानवाची ही अशी न्यारी, रक्ताळलेली रीत ! बोलण्यांत लबाडी, चालण्यांत लुच्चेपणा ! वागण्यांत ढोंगीपणा ! हसण्यांत दांभिकता ! रडण्यांत सोंग ! धूर्तपणा नि असत्य ह्यांचं मूर्तिमंत प्रतीक म्हणजे देवा, आपणच निर्माण केलेला हा मानवप्राणी ! नि त्यानें आम्हांलाच काय म्हणावं ? तर आम्ही काकडीला राजी ! होय, आम्ही सगळ्यालाच राजी ! देवा, आपला माणूस मात्र कशालाच नसतो राजी ! सारखी आपली नाराजी !


देवा, आम्हांला दुर्बल केलंत, ही आपण फार मोठी चूक केली आहे आमच्या बाबतींत ! ना शिंग, ना पंजे ! ना तीक्ष्ण सुळे ! ना बाण ! श्वानाचा मान नाहीं नि मानाचं पान नाहीं ! चंद्रासारखंच कलंकित आयुष्य ! तो लुच्चेपणाचा डाग कायमचा आम्हांला डकलेला !

म्हणजे ऱ्हखाद्या विश्वतारक महतासारखे जरी आम्ही आचरत असलों, तरी कुणाचा विश्वास नाहीं आमच्यावर ! जग एक वेळ गोऱ्यांवर विश्वास ठेवील, पण आमच्यावर नाहीं ठेवणार ! कथांतून, लहान मुलांच्या गोष्टींतून, कवितांतून आमची ही राजरोस नालस्ती युगानुयुगं चालली आहे ! चालूं दे ! चालूं दे ! जग आमची टिंगलच करीत आहे ! करूं दे ! संत-महंतांची टर उडविणं ही जगरहाटी फार पुरातन आहे ! पुराणा आहे हा संप्रदाय ! तुकारामबुवांचं तेंच झालं ! मला नाहीं नवल वाटत !

पण एवढं बरीक सांगतों, निदान आपल्या देशापुरतं ! जो गुण माझा स्थायीभाव असं मानव समजतो, तो लुच्चेपणा म्हणा, धूर्तपणा म्हणा, कावेबाजपणा म्हणा, किंबहुना, हे सगळे गुण, ही तथाकथित चाणक्यनीति,

जर भारतीयांनीं अंगीं खिळविली असती ना, तर जगाचा इतिहासच बदलला असता ! शनिवारवाड्यावरचं निशाण कधींच खालीं उतरलं नसतं ! आपल्या देशाचा विस्तार फिलीपाईन्स, लाओस, कंबोडिया, जावा, सुमात्रापर्यंत झाला असता !

पण...पण देवा, भारतीयच काकडीला राजी ठरला नि हें अस्सं झालं ! अस्सं झालं !



# आधींच मर्कट ...!

ब्रह्मदेवानं सृष्टि निर्माण करण्याचा उपद्व्याप केला. आपण प्राणीसृष्टि जन्माला घातलीत देवा ! आपल्या कलाकुसरीचा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणजे मानवप्राणी, असा आपण आणि अखिल प्राणीसृष्टीनं भयानक गैरसमज करुन घेतला आहे! वास्तविक आम्ही मानवजातीचे प्र ... प्र ... प्र ... प्र ... ( एन्थ् डिग्रीपर्यंत ) प्रपितामह ! हा वडीलकीचा मान बाजूला सारुन, आमच्या निरंजन बागडण्याला मर्कटलीला असं भयंकर अपमानास्पद हिणवून आपण नि अखिल मानवजातीनं आमचा संतापजनक अपमान केला आहे !

आम्हीं आमचा देह जर मानवाला व आपल्याला आंदण दिला नसता, तर उत्क्रांतीला अवसरच मिळाला नसता आणि हत्यापिपासू माणूस पृथ्वीतलावर निर्माणच न झाल्यामुळें जग सुखी झालं असतं ! आमच्या औदार्याचा आपण भलताच फायदा उठविलात नि जगांत दुःखच दुःख निर्माण केलंत. विश्वनिर्मिति करण्याइतपत आपली प्रज्ञा नि कल्पकता प्रगल्भ नि सृजनशील होती. केवढी भयानक चूक केली आहे आपण देवा, ह्याची कल्पना, देवलोकांत विहार करीत असतांना, अमृताचे चषक सौंदर्यवान् अप्सरांच्या विभ्रमपूर्ण सहवासांत प्राशन करीत असतांना, आपल्याला न होणं साहजिकच आहे !

आपण मानवाला चांगला अंगठा दिलात नि माणसानें जगाला व आपल्यालाही चांगलाच अंगठा दाखविला ! एवढ्या मोठ्या विश्वाची प्रतिष्ठापना मोठी सुरेख केलीत ! खगोलाचं एक अनंत विश्व अंतराळांत रचिविलंत. क्षणाचाही फरक त्या फिरत्या चाकोरींत नाहीं पडत. जो तो आपली पायरी सांभाळून वागतो ! उगाच वारेमाप धावपळ करीत नाहीं ! आपलं अंतर सोडून लगट करीत नाहीं !

पण … पण आमच्या अंगठ्यांत फरक केलात … जरा ढकलंत आमच्या अंगठ्याला आणि रुंदावलात मानवाचा पंजा ! त्या इंच दोन इंचांच्या फरकामुळें आपण अपार कष्ट करून निर्माण केलेल्या ह्या जगाच्या आतां टिकऱ्याठिकऱ्या करणार आहे तो माणूस ! पिंपळाच्या पानावर आरामशीरपणें आपण अंगठा चोखत तरंगत होतां, नि म्हणून तर ही महाभयानक चूक आपल्या हातून झाली नाहीं ना ?

आपल्या ह्या गाफिलपणामुळें पत्थरयुगापासून अणुयुगापर्यंतची वाटचाल झाली. आपण मानव निर्माण केलात. पण देवत्वनिर्मित चांगुलपणामुळें आपल्या लक्षांत नाहीं राहिलं, कीं दुष्टप्रवृत्तींचा केवढा भयानक राक्षस आपण निर्माण करीत आहोंत, नुसत्या दुष्प्रवृत्तींचाच नव्हे, तर कृतघ्नतेचा !

देवा, मी म्हणतों कृतघ्नतेचाही ! आमच्यांतल्या एका महापुरुषामुळें आम्हांला थोडा तरी दर्जा मिळाला आहे ! वास्तविक त्याच्यावरही अन्यायच झाला आहे !

कृष्णशिष्टाई केली गेली, तेव्हां भगवान् श्रीकृष्णांना मान केवढा होता ? पुरुषोत्तमच ते ! शेपटावर भार ठेवून मारुतिराय लंकेंत गेला ! एवढ्या मोठ्या बलाढ्य रावणासमोर उच्चासन करून बसला ! लंका पेटविली ! दग्धभूमि ! ( 'स्कॉर्च्ड् अर्थ पॉलिसी' तेव्हांपासूनचीच बरं का ? ) जगांतल्या कुठल्याही 'पी. डब्ल्यू. डी.' ला जमणार नाहीं इतक्या थोड्या वेळांत सेतु बांधला ! लक्ष्मण निश्चेष्ट पडल्यावर अवघा दवाखानाच उचलून आणला ! प्रभु रामचंद्र विजयी होत्साते संतोष पावले ! सेवक मारुतिरायानें आपली छाती फाडून प्रभूंनाच स्वदर्शन दिलं !

म्हणजे मी तर असं म्हणतों, कीं रामायण हें मारुति-पुराणच आहे ! हनुमानांनीं ती शिष्टाई केली नसती, अक्षरशः आग लावून तो 'सॅबोटेज' ( घातपात ) केला नसता, सेतु बांधून सेनेला पलीकडे जाणं सुलभ करून दिलं नसतं, लक्ष्मणासाठीं द्रोणागिरीवरचा क्लोरोफॉर्म तातडीनें आणला नसता, तर रामायणांत फारसा राम राहिला नसता !

म्हणजे रामायणाची धुराच ज्यानें संभाळली, तो बिचारा मारुतिराया मागेंमागेंच राहिला ! ( बॅक् ग्राउंडमध्यें ! ) आमच्यावरच्या अन्यायाची सुरुवात इथूनच झाली आहे देवा !

आपण आम्हांला विद्रूप केलंत ! ह्या विद्रूप चेहऱ्यावर मिस्किलपणाची अशी कांहीं छटा आम्हांला जन्मतःच दिलीत, कीं आम्ही दिसतांच हेटाळणीची स्मितरेषा उमटावी ! सर्वांत राग येत असेल, तर ह्या कुत्सित हसण्याचा !

देवा, वनराजींत आम्ही सुखेनैव संचार करतों ! ह्या झाडावरून त्या झाडावर उलट्यासुलट्या उड्या नि कोलांट्या मारून अंतर्यामींचं दुःख

विसरण्याचा आम्ही केविलवाणा प्रयत्न करतों. कुणाच्या अध्यांत नाहीं कीं मध्यांत नाहीं ! कंदमुळं खातों ! सात्विक आहार ! शुद्ध राहाणी नि उच्च विचारसरणी ! अहिंसेचे उपासक आम्ही ! जंगलांत राहून भारतीय तटस्थतेनें अहिंसेचं तत्त्व पाळतों ! पण ... पण लक्षांत कोण घेतो ?

आंबट बोरं नाहींतर तुरट जांभळं मजेत झाडावर खात असतांना एकाएकीं वाघोबाची डरकाळी ऐकूं येते नि गाळण उडून आम्ही अक्षरशः व्याघ्रराजापुढें वरून कोसळतों ! हिटलरच्या पॅन्झर्स डिव्हिजनपुढें फ्रान्स कोसळला तस्से !

देवा, वानप्रस्थाश्रमाचं माहात्म्य आपण गातां, पण जंगलांत कधीं फेरफटका मारला आहांत का कधीं ? आम्ही कपिध्यान लावून बसतों ! अस्पृश्य प्राण्यापासून, विशेषतः मानवापासून दूर राहातों ! जग हें सच्चिदानंदस्वरूप आहे. त्याचा आविष्कार पटविण्यासाठीं स्वच्छंदपणें खेळून, वागडून, आनंदानें दिवस काढतों. ब्रह्मानंदाची कल्पना आपल्याला आमच्या जीवनावरूनच सुचली असावी ! आम्ही मुक्त आहोंत ! बंधनाच्या पलीकडे तर एकसारखीं उड्डाणंच मारीत असतों. सेवाभाव हा स्थायीभाव ! खुद्द रामायणच ह्याची ग्वाही देईल !

पण ... पण देवा, आमच्यावर अन्याय करण्याच्या भरांत आपण केव्हढी विश्वव्यापी चूक करून बसलात. कारण आपण ज्याला देवत्व दिलंत, तोच मानव राक्षस होऊन आपल्या झगमगत्या सिंहासनावर बसणार आहे. नि तेवढ्यानेंच त्याचं भागणार नाहीं ! त्या देवसिंहासनाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडवील तो ! पृथ्वीच्या अक्षांश आणि रेखांशांच्या कांटेरी तारांनीं तो जखडून, बांधून ठेवील तुम्हांला ! त्याला जगविण्यासाठीं सूर्याची भट्टी तुम्ही युगानुयुगें पेटती ठेवलीत ! त्याच भट्टींत तो देवलोक जाळून टाकील ! शनिभवतालचं जें तामसी, लालसर कडं आहे, त्याचंच करील तो सुदर्शन चक्र नि भिरकावील तुमच्या नीळकंठावर ! पृथ्वीवर

प्रतिचंद्र निर्माण करून तो आकाशगंगेला जीववेणी भरती आणील नि करील स्वर्गबुड !

देवा, आमच्यावरच्या अन्यायांची शिक्षा मात्र आपल्यालाच होण्याचा दाट संभव आहे आणि त्याचीच आम्हांला फार खंत वाटते ... दुःख होतं ! पण ... पण ... आतां म्हण उलटी करायला हवी ! एके काळीं अशी म्हण प्रचलित होती, कीं ज्याचा विनाश करायचा असेल, त्याला देव आधीं वेडा करतो ! देवा ... देवा, आतां ही म्हण माझ्याच मुखानें कशी वरं उलटवूं ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ वि. ..............
क्रमांक ........ नोंद दि. ..............



# पयःपानं भुजंगानाम्....

देवा, आपण मला आसन म्हणून वापरलंत! एकदा मर्दनही केलंत! पृथ्वीचा नि आपला भार खुषीनें सांभाळला त्याचं बक्षीस मात्र आम्हांला छान मिळालं!

जन्मजात आमचा स्वभाव तापट नि मानी! फट् म्हणतां ब्रह्महत्या! आमच्या आसपासच्या दर्भाच्या काडीला जरी इवलासा धक्का बसला, तरी आम्ही ही अश्शी खाडकन् फणा उभारतों! प्राणीसृष्टि आम्हांला चळचळ कांपते! नि इथेंच देवा, आमच्या जीवनांतला भयानक ...धाभास निर्माण झाला आहे!

कथा-पुराणांनीं आम्हांला जवळ जवळ देवत्वाच्या पायरीवर ठेवलं आहे. पुराणकालीं ' डनलॉप् पिलो ' नसल्यामुळें, आपण आमचा आसरा घेतलात. कृष्णावतारीं आपणच आमच्या फणेवर थैमान घालून आम्हांला अमर केलंत ! सर्पयोनीला एक गूढ, अतिमानवी नि रहस्यपूर्ण असं एक सोनेरी, झगमगतं वलय निर्माण झालं ! गुरुचरित्रांतसुद्धा आमचा उल्लेख झाला. कैलासपति भोलानाथानें तर आमचे सर्वांत जास्त लाड केले ! त्यानें आम्हांला अक्षरशः गळ्यांतला ताईत बनविल्यापासून आमचा स्वर्गीय दर्जा केव्हढा उंचावला !

दुर्वास ऋषीसारखे शीघ्रकोपी, वसिष्ठासारखे देवरूप, जमदग्नीसारखे संतापी, व्यास-वाल्मीकींसारखे चिंतनशील, अशा परस्परविरोधी गुणावगुणांची आपण ही जी सजीव, सळसळती शलाका निर्माण केलीत, त्यामुळें आपण काय साधलंत ?

एकतर आमचा देह हा असा लिबलिबीत, गिळगिळीत करून ठेवलात ! धड ना त्याला एक पक्का आकार ! इतर प्राण्यांना डौलदार घाट ! आमचा हा असा वळवळता थाट ! राहायचं तेंही अंग चोरून ! खबदाडांत, बिळांत, कडेकपारींत, पण चोरूनच ! मातीशीं रंग मिसळवूनच ! स्वतःचं जातिवंत, खानदानी अस्तित्व डावलूनच ! हें असं लाचार जिणं ! पांडवांना अज्ञातवास अवघा एक वर्ष ! आम्हांला मात्र आयुष्यभर ! उघड्यावर यायचीच खोटी, कीं युद्ध सुरूच !

ह्या सर्व अन्यायांवर जर कुणीं कळस केला असेल, तर त्या दोन विषारी दंतराजांनीं ! तें विष पचविणारे एकच नि ते तर कायम हिमगिरीच्या अत्युच्च शिखरावर ध्यानस्थ बसलेले ! बाकी सर्व सृष्टि टरकते आम्हांला ! टरकते तर खरीच, पण ... पण ह्याचंच तर दुःख होतं फार ! आमचा मनापासून द्वेष नि तिरस्कार ! आमचं नांव घेतांच माणूस आपलं अंग शहारवितो ! रात्रीं आमचं नांव कांहीं लोक खुणेनेंच

घेतात ! आमची गांठ चुकून पडली नि आम्ही जरी निमूटपणें आपल्या वाटेनें सरसरत असलों, तरी आरडाओरडा करून माणूस आमचा कपाळमोक्ष करण्यासाठीं जिवाचा आटापिटा करतो.

ह्याला कारण आमचे सुळे, ते विषारी सुळे ! सुळ्यांनीं आमच्यावर दांत धरला ! देवा, आम्हांला साधेसुधेच सुळे दिले असतेत ना, तर आम्ही लोकमान्य झालों असतों ? खेळणं म्हणून मुलांबाळांनीं आमचा वापर केला असता ! गरीब बायाबापड्यांनीं आमचा सोनेरी कंबरपट्टा म्हणून वापर केला असता ! सोनेरी झालर म्हणून शेमलेवाल्यांनीं आमचा उपयोग करून घेतला असता ! केव्हढं कौतुक झालं असतं आमचं ?

केवळ रोहिदासाला दंश केला म्हणूनच नव्हे, तर आजवर लाखों मानवांना दंश केल्यामुळें नि आमच्या त्या दोन इवल्याशा सुळ्यांमुळें अगणित मानव प्राणी तडफडून तडफडून मेल्यामुळें, अखिल मानवजात ही आमची शत्रु बनलेली आहे. केवळ चावणं ह्या आमच्या स्वभावधर्मावर बोट ठेवून आमचं नांव तिनें कायमचं बदनाम करून ठवलं आहे !

आमच्यांतले कांहीं — कांहीं काय बहुतेक — विषारी नसतात ! पण प्रत्येकाचे सुळे तपासून पाहायचे कुणीं ? बरं, रंग तरी एक ? छट् ! बात नको ! सोनेरी, तपकिरी, करडा, कबरा, पट्टेरी, पांढरट, काळाकुट्ट, पिवळाजर्द ... असे तऱ्हेवाईक ! लांबी-रुंदी तरी प्रमाणांत ? नाहीं ! अंगठ्याएवढ्या प्रकारापासून तों खोलीभर पुरून उरणारा ! हिंस्र फूत्कार ! भयानक अभिनिवेष ! मृत्यूचं तांडवनृत्य !

देवा, आमच्या त्या विषारी सुळ्यांत आपण जर अमृताचे बिंदु सांठविले असतेत, तर किती बरं, बरं झालं असतं ! जगाची उत्पत्ति करतांना कांहीं ठिकाणीं आपण जरा धिसाडघाईच केलेली दिसते ! आमच्या बाबतींत तर आपली कलाकुसर फारच लंगडी पडली.

सळसळत्या केतकीच्या पानांत नि नागराजांत कांहींच फरक नाहीं का महाराज ! केतकीचं कांटेरी पान सुगंध दरवळीत असतांना तें औद्धत्यानें उपटणाऱ्या एखाद्याला फार तर सौम्यसा दंश करील, पण आमचा मामला फार कडक ! दयाक्षमा नाहींच ! दंश म्हणजे मग सरणावरच नांदी ! पण ... पण ह्या हालाहलांतही मानव आतां अमृत शोधूं लागला आहे. मृत्यूची भयसूचक घंटा वडविणाऱ्या त्या विषबिंदूतून अमृतबिंदु निर्माण होत आहेत


आजवर आम्हीं मानवाचा संहारच केला ! पण आतां त्या संहारक्षम द्रवांतून मरत्या माणसाला उठविण्याची ताकद पैदा केली जात आहे ! आजवर आमचे खरे हाडाचे वैरी होते मुंगूस नि माणूस ! आहेतही ! पण एक वेळ मुंगूस परवडेल ... माणूस नाहीं !

पण देवा, ह्यांतूनही आमच्या जीवनांत विरोधाभास सारखे निर्माण होताहेत. विषांतून अमृत निर्माण करायचं ! माणसाला चावायचं आम्हींच नि मरतांना त्याला वांचवायचंही आम्हींच ! नागपंचमीला आम्हांला देवत्व देऊन दुधाचा नैवेद्य दाखवायचा नि वर्षभर मात्र 'पयःपानं भुजंगानां केवलं विषवर्धनम् ।' घोकीत राहायचं ! शंकराच्या पिंडीभवतीं पहुडल्यावर फुलांनीं-पत्रांनीं पूजा होते, तिथून बाहेर पडतांच होते, ती मात्र खेटरांनीं, दगडाधोंड्यांनीं ! दूध पाजणारे हातच आमची फणा छिन्नविच्छिन्न करतात ! आमच्या जीवनांतले हे भयानक विरोधाभास कुणाच्याही नशिबीं नाहींत देवा !

पिकांची नासधूस करण्याऱ्या उंदरांचा, घुशींचा नि बेडकांचा उपद्रव कमी व्हावा, म्हणूनच जर का आमची निर्मिति आपण केली असेल, तर फारच क्षुद्र कारणासाठीं आम्हांला जन्म घ्यावा लागला, नाहीं का ? निसर्गाची सांखळी तशी आपण भरभक्कम गुंफली आहे, पण त्यांतला आमचा दुवा एकंदर कच्चाच. त्यांतून देवत्व, दैत्यत्व नि मानवत्व

ह्या सर्वांची सरमिसळ करून आपण आमची अवस्था फारच केविलवाणी करून ठेवली आहे !

असो ! त्याला इलाज नाहीं ! पण आमची एकच प्रार्थना आहे देवा ! आपणच आम्हांला विषारी केलंत ! तो कांहीं आमचा दोष नाहीं ! पण विषारी नसून विषारी बनणाऱ्या मानवाचे दांत मात्र चांगलेच ठेचा एकदा ! म्हणजे सारं कसं सुरळीत चालेल ! जग सुखी होईल कदाचित् !



# बंदिवान पोपटा ऽ

हिरव्या नि पोपटी रंगांतला गारवा नि मांगल्य आपण पाचूंत नि माझ्यांत ठासून भरलंत ! छान केलंत ! 'रूपवती भार्या शत्रु' ह्या सिद्धान्ताप्रमाणें आम्ही थोडे रूपवान् ! नि म्हणूनच आम्हांला जन्मठेप ! आमच्यांतले जे महाभाग स्वतंत्र असतात, किंवा कांहीं काळ राहातात, त्यांचा आम्हांला फार फार हेवा वाटतो.

गुलामगिरींत सौख्य वाटून घेण्याची प्रवृत्ति मग निर्माण होते ! पिंजरा हें स्थानबद्धतेचं प्रतीक, किळसवाणं प्रतीक ! पण त्याची घृणा वाटण्याऐवजीं प्रलोभन वाटूं लागतं ! पेरू, शेंगा, श्रीमंताच्या घरीं पडलों

तर डाळिंबाचे दाणे ! ह्या सात्त्विक फलाहाराच्या प्रलोभनासाठीं स्वातंत्र्याची जबर किंमत देण्यास मन तयार होतं !

वडाच्या झाडाची आठवण येते ! चिंचेचं झाड मन मोहरून टाकतं ! फुललेली वृक्षराजी पिंजऱ्यांतून पाहून मन हेलावतं नि अंतःकरण आमच्या चोंचीपेक्षां लालभडक होऊन रक्तबंबाळ होतं. पण नुसते पंख फडफडावण्यापलीकडे आम्ही तरी काय करणार ?

एवढा मोठा महत्त्वाकांक्षी नि बुद्धिमान् मानव ! तोसुद्धा प्रलोभनाला लालचावतो ! जगाच्या इतिहासाला हिऱ्या-मोत्यांच्या नि सुवर्णाच्या अलंकारांनीं किती कायम स्वरूपाचं वळण लावलंय्, ह्याचा जर देवा, आपण जरा आढावा घेतलात ना, तर आपण आमच्या क्षुद्रपणाला कधींही हसणार नाहीं ! छत्रपति शिवाजीमहाराजांच्या हिकमतीइतकीच थोड्याफार प्रमाणांत त्यांच्या रत्नांनीं, त्या आग्र्याहून झालेल्या सुटकेला मदत केली नाहीं का ?

बलदंड सार्वभौम राजांची क्रूर नजर एखादं झगमगतं रत्न पाहून चावचळली नाहीं का ? बुलंद किल्ल्यांच्या गुप्त वाटा नि रहस्यपूर्ण भुयारांचीं कवाडं, हिऱ्यामाणकांच्या लोभानें खुलीं झालीं नाहींत का ?

निदान आमच्यावर हा दोष कुणी लादणार नाहीं ! आपण आम्हांला संग्रहणीय केलंत, हा कांहीं आमचा दोष नाहीं ! अनंत अवकाशांत प्रच्छन्नपणें विहार करावा, ह्या फांदीवरून त्या फांदीवर आमच्या कुटुंबीयांसह भराऱ्या मारून निळ्या आकाशाला रंगीत वाकुल्या दाखवाव्या, हवेंत तरंगतांना क्वचितच पंखांची फडफड रोखून, सेबर जेट्सना लाजवावं, घरटीं बांधावींत, तीं मोडावींत, पुन्हा बांधावींत. पावसाच्या सरी कोसळत असतांना एखाद्या काळोख्या ढोलींत आसरा घेऊन चूपचाप बसून आत्मचिंतन करावं, हा आमचा साधाभोळा जीवनमार्ग ! भूमातेच्या कुशींतूनच निर्माण झालेली खाद्यपेयांची संपत्ति

मनसोक्त लुटावी, पण त्या लुटारूपणांत मानवासारखी हावरेपणाची सांठेबाजी नसावी, हा आमचा निरंजन खाक्या! पण सुंदर नारींचं अपहरण व्हावं, तसंच आमचंही आजतागायत चालू आहे नि चालू राहाणार! नि त्याला सर्वस्वीं आपण जबाबदार आहांत देवा!

विशेष हें, कीं अपहरण करणारा चोर आपलीच प्रतिकृति आहे असा बडेजाव मारीत असतो. बकध्यान लावून बसणारा माणूस शुकहरण करीत असतो. त्याला काय म्हणून नको असतं? जडजवाहीर, भूमि, मुलायम वस्त्रं, अलंकार, सुगंध, द्रव्य, गाई-म्हशी, अखिल चराचर सृष्टि नि आम्ही! ज्या ज्यावर म्हणून नजर पडेल, तें तें त्याला हवं असतं! पृथ्वी आपल्या मालकीची! तीच त्याला बळकावायची असते. तेवढ्यानें भागत नाहीं म्हणून तो आतां चंद्रावर झेपावूं लागला आहे. खगोल सृष्टीवर त्याचा अभद्र पंजा आतां फिरूं लागला आहे. प्रभावी दुर्बिणींतून त्याची खलदृष्टि आतां अंतराळाचा वेध घेऊन, एका शुद्ध सृष्टीवर वाकडा डोळा लावून बसली आहे!

देवा, आमच्या पोपटी, आकर्षक शरीरसौंदर्यामुळें भागलं नसावं म्हणूनच कीं काय, आपण आमचं मुखकमल मोठं सुंदर करून ठेवलंत! देवदेवतांच्या स्वर्गीय सरोवरांतच फुलणाऱ्या लालभडक कमळांच्या पाकळ्यांचा रक्तवर्ण आपण आमच्या मुखीं कोंबलात नि आमच्या फडफडत्या जीवनाचा विडा हा असा कायमचा रंगविलात! भूगर्भांतल्या सर्व माणकांनीं आमच्याकडे पाहून लाजावं असं आमचं आरक्त वदन! बोलकं माणिकं, फडफडत्या पाचूंत बसवलेलं! नि जगांतल्या किंमती रत्नांचं झालं तेंच आमचं झालं. घात! बंदिवासाची भीति!

जग ही एक मोटी बंदीशाळा आहे असा टाहो फोडणारा माणूसच सर्व जगाला कोठडींत ठेवण्यासाठीं धडपडत असतो! दगडी भिंतींमुळें तुरुंग निर्माण होऊं शकत नाहीं अशी बढाई मारणारा माणूस पिंजऱ्यामागें

मिळेल त्याला डांबण्यांत आसुरी आनंद मानीत असतो. स्वातंत्र्य नि मानवतावाद, करुणा नि विश्वबंधुत्व, ह्यांचा डांगोरा पिटत असतांनाच गुलामगिरीच्या शृंखला कैद्यांच्या पोटऱ्यांत घुसून त्या रक्तबंबाळ कधीं होतील, ह्याची वाट पाहात बसतो !

मोठ्या राष्ट्रांना लहान राष्ट्रं आमच्यासारखींच भासत असावींत ! बलाढ्य देश छोट्या देशांसाठीं मोठमोठे पिंजरे करण्यांत मग्न असतात. प्रलोभनांची व्याप्ति कालानुसार बदललेली ! पण अंतिम ध्येय एकच ! नि तें म्हणजे कुणींतरी कुणालातरी पिंजऱ्यांत डांबून ठेवायचं ! केव्हां केव्हां हे पिंजरे अदृश्य स्वरूपाचे असतात. ते तर फारच भयानक ! स्वातंत्र्याचा आभास निर्माण होऊन पारतंत्र्यांत जिणं जगण्याची पाळी ! पुन्हा पिंजरा नाहीं ! पाय जखडून टाकलेले असतात तेही अदृश्य सांखळदंडांनीं ! ते खळखळवून मनाचं समाधान करून घेण्याचं समाधानही नाहीं ! साराच कोंडमारा ! बोलायचं तें खोटं बोलायचं, आमच्यासारखं ! बोलायचं तें दुसऱ्याच्या जिव्हेनें बोलायचं ! मदतीचे शेंगदाणे, पेरू नि डाळिंबं मिळतात. मग अंतरींचा कोंडमारा होतो तो भलताच दाहक !

आम्ही पोपट ! पण पोपटपंची करतो तो माणूस ! आम्ही धन्याला खूष करण्यासाठीं नाइलाजानें चार बोबडे बोल बोलतों. हा मात्र स्वार्थासाठीं निर्लज्जपणें लळघोटेपणा करतो. आम्ही ह्याच्या पिंजऱ्यांत ! हा कार्यव्याप्तीच्या कांटेरी पिंजऱ्यांत ! समाजाच्या पिंजऱ्यांत ! विश्वाच्याही ! आणि ह्या उप्पर एक कवि आम्हांला चक्क हाक मारतो, ' बंदिवान पोपटा ऽ '

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ........ वि ..........
क्रमांक .......... नोंद दि..........



# कुत्र्याचं शेपूट . . .

इमान, स्वामिभक्ति, लळा, प्रेम, माया, ममता, वात्सल्य, स्वाभिमानशून्यता ह्यापायीं आमचं जीवन आजवर बरबाद झालं. ह्याचं कारण, देवा, आपण एक खुळा मेंदू आमच्या मस्तकांत रिचवून टाकलात ना, म्हणून ! चतुष्पाद-निर्मित हिंस्रपणा नि द्विपादनिर्मित देवत्व ह्यांचा इतका लोकविलक्षण समन्वय जगांत कुठें झाला नसेल ! परमेश्वरा, माणसाला द्यायचे गुण आपण आम्हांला बहाल केलेत नि आमचे दिलेत माणसाला ! ही अदलाबदल आपण एखाद्या घिसाडघाईच्या क्षणीं केली असेल असं म्हणावं, तर तसंही सरळ म्हणतां येत नाहीं ! कारण आमच्यांत

जें जन्मतःच आहे, जो आमचा मूळस्वभावच आहे, तसा माणूस वागतच नाहीं ! चांगलेपणा त्याला आपल्या अंगीं मोठ्या प्रयासानें मुरवावा लागतो. मनन, चिंतन, वाचन, शिस्तबाज आयुष्य, योगाभ्यास, भक्तिमार्ग ह्या सर्वांचा आधार घेऊन माणूस जरा कुठें आमच्यासारखा होण्याची नक्कल करतो !

देवा, आपला प्रमाद हा, कीं आपण आम्हांला चांगुलपणाची अतिरिक्त देणगी देऊन आम्हांला निकामी करून ठेवलंत ! चांगुलपणा म्हणजेच देवत्व ! माणुसकी म्हणजेच देवत्व ! कृतज्ञता म्हणजेच देवत्व ! भक्ति म्हणजेच देवत्व ! ह्या सर्वांचा मक्ताच आमच्याकडे ! नाहीं नाहीं आपल्याकडेच ! कारण आपण म्हणजेच सर्व सद्गुणांचं मूर्तिमंत प्रतीक ! असं असतांना आपण हा दैवी वारसा, अंशतः कां होईना, दिलात कुणाला, तर आम्हांला ! जगांत ज्या अनेक अतर्क्य गोष्टी आहेत ना, त्यांतली ही एक ! नाहीं का हो ? आम्हांला तोंड भुंकायला दिलंत तोंवर ठीक होतं ! पण कधींकाळीं तसाच प्रसंग पडल्यास दुसऱ्याला चावायला दांत दिलेत, ही बरीक वाईट गोष्ट झाली ! म्हणजे चावण्याची क्रिया होतांक्षणींच आम्ही एका क्षणांत देवलोकांतून राक्षसलोकांत घरंगळतों ! ज्या हातानें प्रेमानें भाकरीचा तुकडा दिला जायचा नि जिभेवरली लाळ गाळीत आम्हीं जो जिभल्या चाटीत मटकावायचा, तोच हात दंशानंतर आमचा कपाळमोक्ष करण्यास क्षणांत सरसावतो ! धनी झोपल्यावर ज्याची राखण जागतेपणीं केली, नि स्वतः निद्रिस्त असतांनाही, चाहुलीची जागती ज्योत ठेवून, अखंड पहारा केला, तोच धनी आमची हत्या करण्यास अभिनिवेषानें सरसावतो.

मानवी कुटुंबांत राहाण्याची अनैसर्गिक प्रवृत्ति आम्हांला देऊन आपण आमचा सर्वनाश केला आहे. देवा, माणूस माणसाळत नाहीं म्हणून आम्हीच आपले माणसाळतों ! आमच्या ह्या आंतरिक

कायाकल्पाचं कौतुक होतं म्हणतां ? छट्! मुळींच नाहीं ! हिडीसफिडीस, हॅट, हॅट ! छूः ! छडीच्या फटकाऱ्याचा सपक् हा आवाज, हे आमच्या जीवनयज्ञांतले मूलमंत्र ! बरं ! माणूस कसा आहे हें हेरण्याची अमोघ शक्ति असूनही, स्त्रीजातीच्या भाबड्या भोळसटपणानें आम्ही आपले फसतोंच ! तसं पाहिलं तर आम्हींच आमच्या हातांनीं, नव्हे पायांनीं, आत्मनाश ओढवून घेतों ! पण त्याला आतां काय उपाय ! नि जबाबदार कोण ? हूँ ! जबाबदार कोण ! देवा, फक्त आपणच हं ह्याला जबाबदार ! नाहीं म्हणायला कांहीं लोकोत्तर महाभागांनीं आमचा मान राखला ! धर्मराज आम्हांला घेऊन शेवटीं गेले ! दत्तमहाराजांनीं आपल्या पवित्र कमंडलूच्या आसपास आम्हाला घोटाळूं दिलं. खुद्द छत्रपति शिवाजीमहाराजांना, आमच्या त्या महापूर्वजांवांचून स्वर्गारोहण करणं ओकं ओकं वाटलं ! आमच्या भुंकत्या प्रदीर्घ जीवनांत झंकारलेले हे अपवादात्मक सूर ! बाकी आमचा तारस्वर अलम दुनियेच्या ओळखीचा आहे !

'समर्थघरींचें श्वान' ह्या उक्तींत आमचा पाणउतारा ठेचून ठेचून भरला आहे. म्हणजे आम्हांला मिळणारा मान समर्थांच्या मोठेपणावरच अवलंबून आहे, एवढंच नव्हे, तर श्वान म्हणजे सदोदित अवमानित करण्याजोगा मूर्ख, लोचट प्राणी हाही अर्थ त्या उक्तींत अभिप्रेत आहे ! आमचं प्रेत पडलं, तरी इमानदारी सुटणार नाहीं, ह्याचाही दर्प येतो त्या शब्दांत !

हें एवढं सारं पुरं नाहीं झालं म्हणूनच कीं काय, जन्मतःच आपण आमच्या शेपटाला असा कांहीं एक भयंकर पीळ भरलात, कीं तें जन्माचं वाकडंच राहिलं! वर आपलं आपणच केविलवाणं हलणारं! जगांतली विषमता, वर्णभेद, ज्यू लोकांचे प्रश्न, हे जसे सदैव वाकडे, तस्संच आमचं शेपूट ! दुसऱ्यांची चिंता वाहातां वाहातां बिचारं एकसारखं हेलकावलं

जात असतं ! म्हणजे पाहा आतां ! डोक्यापासून शेपटापर्यंत एकही भाग सरळ नाहीं ! सारं आपलं कसं वाकडंच ! वाकडेमहाराज ! हेंचि फळ काय तव तपाला ?

स्वामिभक्ति, स्वगृहप्रेम, देशप्रेम ह्या सर्व उदात्त भावनांचा उगम आमच्यापासूनच झाला आहे, असा आम्हीं जर दावा केला, तर त्यांत काय चुकलं ! नि ह्या सर्व सद्गुणांचा परिपाक होऊन आम्ही जे झालों, त्याला जबाब कशानें मिळाला ? लगुडप्रहार ! सांखळीनें बंदिस्ती ! गळ्यांत चर्मपट्टिका ! गुलामांचीच गुलामगिरी आयुष्यभर करायची !

देवा, आमची निर्मिति करतांना तारतम्यभावांत आपण घसरलात असं म्हटलं, तर रागावूं मात्र नका हं ! फाटक्या चिंध्यांत भटकणारा एखादा भणंगभिकारी, कुलंगी कुत्रा पाळतो. सर्व जगापुढें भिकेसाठीं तोंड वेंगाडणारा हा दरिद्री माणूस भिक्षा मिळाली नाहीं तर दगड मारतो आमच्या डोक्यावर ! म्हणजे पाहा ! भिकाऱ्यांतल्या भिकाऱ्याची ही अशी आमच्या बाबतींत मिजास नि टर्रेबाजी ! आमच्या गळ्यांत तो एखादं दोरखंड बांधतो ! त्याच्या स्वामित्वाचा डांगोरा पिटण्यासाठीं ! पाहा ! हा कुत्रा माझ्या मालकीचा आहे ! उभ्या दुनियेंत माझं असं कांहीं नसलं, तरी हा कुत्रा माझ्या मालकीचा आहे. त्याला मी हाणीन, मारीन, उपाशी ठेवीन ! वाटल्यास एखादा शिळा तुकडा टाकीन त्याच्यापुढें ! पण गळ्यांत दोरखंड बांधीन त्याच्या !


म्हणजे काय गंमत आहे पाहा देवा ! स्वतःचं प्रभुत्व आणि हुकूमशाही दुसऱ्यावर लादण्याची माणसाची केवढी ही भयानक प्रवृत्ति … एखाद्या भिकाऱ्यापासूनही ! कुणाला तरी जखडून, बांधून ठेवावं, सांखळींत अडकवून ठेवावं, गुलाम करावं ! ही त्याची वृत्ति, राजापासून रंकापर्यंत ! आमच्या प्राणीसृष्टींत गुलामगिरी वर्ज्य आहे ! पोटाची गुलामगिरी शिकारीनें होते नि प्रबळ, दुर्बळाला मारून खातो, भूक

लागल्यावर ! एरव्हीं नाहीं ! वाघ सशाला कैदेंत ठेवत नाहीं ! हत्ती गाढवाला सोंडेंत पकडून ठेवत नाहीं ! सर्प बेडकाला गुंडाळून ठेवत नाहीं ! जंगलाच्या कायद्यांत स्वच्छंद विहार नाहींतर मुक्ति हे दोनच प्रकार !

पण सामान्यांतला सामान्य माणूस आपलं क्रूर स्वामित्व आमच्यावर लादतो. शहाणा झाला, तर योगाभ्यास करून मुक्तीसाठीं धडपड करतो ! पण आम्हांला मुक्ति देत नाहीं. सहसा मोकळं सोडत नाहीं !

देवराया, डुकरापुढें बसराई मोत्याची रास पसरावी तसे आपण आम्हांला उत्तमोत्तम गुण दिलेत, पण जगाच्या उकिरड्यावर ते नाहक फुकट गेले. कारण त्या गुणांचं चीज करणारा माणूस आतां इतक्या निकृष्ट दर्जाला पोंचला आहे, कीं त्याच्या भक्तीमुळें आपणही बिघडण्याचा धोका निर्माण झाला आहे देवा !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. वाचनालय शाखा.
अनुक्रम ०७६०७ दि. –
क्रमांक ३०० नोंद दि. ३१-३-६०



# बैल गेला नि . . .

आम्ही धान्य पिकवतों पण उपाशीच असतों बहुतेक! मानवी जग आमच्यामुळें जिवंत राहातं, पण आम्ही मरतो तेव्हां! शेतं डंवरतात, मका झुलतो, बाजरी डुलते, आळसटलेल्या माहेरवाशिणीसारखी! भाताच्या पेंढ्या सुस्तपणें पेंगुळतात, गहूं गहिंवरतो, जोंधळा जोबनवाला होतो नि हें सर्व करतां करतां आम्ही म्हातारे नि निकामी होतों!

देवा, लौकिक अर्थानें जरी आम्ही चतुष्पाद असलों, तरी आमच्या नशिबीं, ओढायचा आणखी एक नांगररूपी पांचवा पाय आणखीन् देऊन, तुम्ही आमच्या पांचवीला कष्ट पुजलेत! इतर सारी जनावरं ह्या खडतर शिक्षेंतून सुटलीं, नि आम्हांलाच कां हो ही शिक्षा?

ज्ञानोबांच्या आणि यमराजाच्या रेड्याचा आपण मान ठेवलात, पण शिवशंकराच्या नंदीचा हा असा भयंकर अपमान काय म्हणून ? शंकराला बेल आणि बैल दोन्ही प्रिय ! वास्तविक बेलापेक्षां आम्ही एका मात्रेनें वरचढ ! पण आमच्या नशिबीं ही अशी जन्मठेप !

श्रमविभागणी करतांना आमच्याच बाबतींत भयानक पक्षपात ही आपली पहिली चूक ! वनगाय ह्या प्राण्याला गाय हें सोज्वळ, धार्मिक व सकृद्दर्शनीं अहिंसक असं नांव असल्यामुळें ती मात्र रानावनांत हवा तो धुमाकूळ घालूं शकते. कुणाच्याही पोटांत आपलीं तीक्ष्ण शिंगं खुपसून हैदोस घालूं शकते.

गोठ्यांत वेळींअवेळीं हंबरडा फोडणं, शेपटीच्या छत्रचामरांनीं सतावणाऱ्या माशा हाकीत बसणं, घाणेरड्या डबक्यांत मानेखालचा सर्व भाग बुडवून ब्रह्मानंदांत मग्न होणं, ह्या असल्या चिंतनशील स्वभावामुळें त्या यमराजाच्या वाहनाला कोणी पुरेसं कामच देत नाहीं मुळीं ! कामचुकारपणा करण्यांत वाकबगार असतात, त्यांना काम मिळूंच नये, हा मानवी सृष्टींतला नियम आपण आमच्यांत आणलात, ही विशेष आश्चर्याची गोष्ट !

पण देवाधिदेवा, आमचं खरं दुःख वेगळंच आहे ! अंतरींची जळजळ भयानक आहे ! धुमसणाऱ्या संतापानें जळणारा अपमानाचा गोलसर ज्वालामुखी आमच्या वशिंडांत भडकलेला आहे, ह्याची आपल्याला जाणीव आहे का ? अंदमानांतल्या बारीबाबाच्या निर्घृणपणानें आपण आम्हांला कोलूला—नांगराला जुंपून संतुष्ट झालां नाहींत म्हणूनच कीं काय, आपण घरभेद करून आमचा आत्मा हा असा सारखा तडफडत, तडफडत ठेवलात !

धेनुवल्लभ असून आमचा दर्जा द्वारपाळाचा, सेवकाचा ! गुलामाचा ! आमच्या सौ. मात्र उच्चपदस्थ ! इतक्या उच्चपदस्थ, कीं त्याला

तोंड नाहीं! तेहतीस कोटि देवदेवतांची आंवळयांची मोट आपल्या उदरांत सामावल्यामुळें सनातन धर्माच्या उगमस्थानांनाच पोटची माया ही अशी विचित्र अवस्थेंत लाभलेली! देवदेवतांचं निधानच तिच्या अंगीं असल्यामुळें ती गोमाता नि आम्ही वृषभ, अनड्वान्, बैल, नुसते ओझ्याचे बैल!

हा पाणउतारा मात्र भयंकर! समानतेच्या तत्त्वावर आम्हां उभयतांना वागविलं असतं, तर आमचं कांहींच म्हणणं नव्हतं! पण हा इतका भयानक पक्षपात्? शंकराच्या पिंडीसमोरचं आमचं स्थान म्हणजे नुसता जुलमाचा रामराम! त्यांत टिंगलीचा भागच जास्त! 'शंभोऽ' असं मोठ्यानें म्हणत देवळांत शिरणारा एखादा भक्त अशा सहजतेनें आम्हांला स्पर्श करतो, कीं त्यामुळें आमचा होणारा अनादर वाढतच जातो! केवढा अन्याय केला आहेस देवा आमच्यावर!

बरं आमच्या हिलाही शिंगं असतात! पण त्यांचं कौतुक नि आमच्यावर अविश्वास! भाविकतेनें गोग्रास देण्याऱ्या वृद्धावर अकारण शिंगं उगारतांना आम्हीं आमच्या हिला अनेक वेळां पाहिलं आहे! ह्या उलट आमचं! संथपणें रवंथ करतांकरतां गोठ्यामध्यें डुलकी घेत असतांना, वात्रट पोरं आमचीं शिंगं धरून आम्हांला उगाच चाळवतात, पण आम्ही आपले "जाऊं दे! पोराची जात आहे ..." असं पुटपुटत दुर्लक्ष करतों नि कडबा स्थितप्रज्ञासारखा चघळत बसतों!

नर आणि मादी ह्यांत नर हा सर्वच बाबतींत श्रेष्ठ हवा असं आमचं म्हणणं आहे ... गाऱ्हाणं आहे ... नि फार काय? माद्यांचीही तीच भावना आहे. पण जगाचं सुकाणूं फिरवीत असतांना ह्या घोक्याच्या लाटा आपण टाळूं शकलो नाहींत व आमची जीवननौका मात्र त्यामुळें साफ बुडाली! पण आमची व्यथा एवढ्यावरच थांबत नाहीं. स्वतःला फार हुशार समजणारा शेतकरी आम्हांला जेव्हां नांगरणीला लावतो

व सकाळीं पेरणीची घाई करतो, तेव्हां मूक हुंकार देऊन आम्ही त्याला सूचना देत असतों ! थांब बाबा ! अजून चार दिवस थांब ! पाणी घेऊन येणारे ढग कोसळायला अजून अवकाश आहे, हें त्याला मूकाभिनय करून अनेक तऱ्हांनीं समजावून सांगायचा प्रयत्न करतों ! पण त्याच्या मठ्ठ डोसक्यांत तें शिरेल तेव्हां ना ? बैल आम्ही नाहीं ? माणूसच खरा बैल !

अन्न देते म्हणून अन्नपूर्णा देवीचं कौतुक होतं, पण ह्या चार पायांच्या अगणित अन्नपूर्णा अपुऱ्या कडब्यामुळें अर्धपोटींच असतात, ह्याची आपल्याला जाणीव आहे काय देवा ? पायांच्या तळव्यांना लोखंडी पत्र्या मारून घेऊन मानव हें असं 'पत्रीसरकार' चालवीत असतो जुलमानें ! आमचे खूर जास्त घट्ट, न झिजणारे असे कां नाहीं केलेत !

आम्ही मोटेवर पाणी ओढतों तोंपर्यंत, किंवा खच्चून भरलेले खटारे रणरणत्या उन्हांतून कित्येक मैल ओढतों, किंवा ह्या नतद्रष्ट माणसांच्या हौशीखातर त्यांच्या छकड्या शर्यतींत धावडवतों, तोंपर्यंत शिमग्याला रंगीबेरंगी झूल चढते आमच्या पाठीवर ! रुणझुणत्या घुंगुरांची मालिका गळ्यांत पडते. पवळ्या-ढवळ्याचं कौतुक, काम करून घेण्याकरतां केलेलं खोटं कौतुक, माणूस क्षणांत विसरतो. खाटकाच्या सुरीच्या तळपत्या रूपानें यमराज समोर ठाकतो ! पायांना दोरखंडं बांधून, उलटं पाडून, कंठ चराचरा चिरला जातो ! रक्ताच्या चिळकांड्या उडतात. माणसाच्या सेवेंत आणखी एक हुतात्मा आत्मसमर्पण करतो ? मातींतून मोतीं पिकविणाऱ्या, स्वतःच्या रक्तांतून पीक निर्माण करणाऱ्या, अखिल मानवतेला घास देणाऱ्या आमच्यासारख्या सहिष्णु, कष्टाळू गरीब जनावराचा हृदयद्रावक अंत होतो !

हा माणूस जितका दुष्ट, तितकाच, किंबहुना, कित्येक पटींनीं आळशी आहे. अशाच एका सातआळशानें आपल्या बागेला कुंपण घालायची चालढकल केली. तेव्हां आमच्या एका भाईबंदानें उपाशी पोटीं बागेंतल्या कोवळ्या रोपट्यांवर ताव मारला, तेव्हां हे राजेश्री जागे झाले आणि कुंपण लगेच घालते झाले. पण तेव्हांपासून हीं टवाळ माणसें म्हणूं लागलीं, 'बैल गेला नि ...'



# गोमातेला चारा ऽ ऽ . . .

एखाद्या सामान्य प्राण्यावर देवत्व लादलं, तर ह्या लादलेल्या मोठेपणामुळें त्या बिचाऱ्या प्राण्याच्या जीवनाची केवढी प्रचंड शोकान्तिका होते, ह्याचं सजीव उदाहरण म्हणजे मी !

माझ्या ध्यानींमनीं नसतांना जेव्हां स्वर्गातलं सर्व देवत्व माझ्या उदरांत स्थायिक झालं, तेव्हांपासून परमपूज्यतेची उपाधि माझ्या शेपटीला डकली !

साध्या, अगदीं साध्या होत्या माझ्या जीवनविषयक अपेक्षा ! आमच्या वल्लभाच्या शिंगाला शिंग घाशीत (प्रेमानें हं !) एखाद्या माळरानावर मनसोक्त हिरवंचार गवत दिवसभर चघळीत राहावं, अंगावर थैमान घालणाऱ्या माश्यांना एक लहरी हिसडा देऊन पांगवावं, शिंगाच्या

आसपास काळ्या औद्धत्यानें ठाण मारून बसणाऱ्या काकराजाला हुसकावून द्यावं, पश्चिमेला सूर्यदेव मावळायला लागला, कीं गळ्यांतल्या घंटिकेच्या तालावर झुलत झुलत गोठ्याच्या रोखानें मंद पावलं टाकावींत नि काळोख पडल्यावर रवंथ करीत सूर्यदेवाच्या पुनरागमनाची वाट पाहात डोळे मिटून स्वस्थ पडावं !

पण वेदांतसुद्धा माझीं स्तुतिस्तोत्रं गाइलीं गेलीं, तेव्हां माझी मीच चपापलें ! खरंच ! मीच का ती ? कृत्रिम गांभीर्य अंगीं सजविण्याचा भगीरथ प्रयत्न केला ! पण खऱ्या किंवा काल्पनिक आक्रमकावर शिंग हाणण्याची नैसर्गिक प्रवृत्ति जाईना !

देवा, आपण आम्हांला दिलेला हा राजयोग आम्हांला फार बेचैन करतोय् बघा ! वात्सल्य, प्रेमळपणा, पूज्यता, वगैरे जन्मजातच आम्हांला चिकटल्यामुळें सारखा कोंडमारा होतो बघा ! आपण आम्हांला जणूं एक विरोधाभास करून ठेवलंय् ! प्रचंड विरोधाभास ! आपल्या कुंभांतल्या अमृताशीं पैजा जिंकणारं सकस दुग्ध आम्ही स्रवतों. ठीक आहे ! आईच्या पुरवठ्यावरून बालक आमच्याकडे झुकतं ! मानवतेची कृतज्ञता ह्या एकाच गोष्टीमुळें बोलकी झाली असावी व माणसानें आम्हांला जें देवत्व बहाल केलं आहे, त्याचंही कारण तेंच असावं !

वास्तविक स्वखुषीनें आम्ही कांहीं दूध देत नसतों. तें घेतलं जातं बळजबरीनें ! आंचळांशीं हिसकाहिसकी करणारे हात लहानपणीं आमच्याच दुधावर वाढलेले असतात, पोसलेले असतात ! आम्ही सापाला नि माणसाला दूध पाजतों ! पण दंश करणं हा दोघांचाही जन्मगुण ! त्याला इलाज नाहीं ! आपणही कांहीं करूं शकणार नाहीं !

वेदकालापासून आमचा जयघोष हा अस्सा सारखा चाललाय्. देवा, जटाधारी ऋषिमुनींनीं आम्हांला सारखं गोंजारलं. एका दृष्टिक्षेपांत कशाचंही भस्म करण्याचं सामर्थ्य असलेल्या तपस्व्यांनीं आमच्याकडे

मात्र मायेची नजर लावली. धारोष्ण दूध घेतां घेतां आम्हांला गोमाता म्हणून वंदनही केलं! शरीरधर्माचं असलं पालन केल्यामुळें एवढा प्रचंड मोठेपणा आजवर कुणाला मिळाला नाहीं देवा! पण हा मोठेपणा मानवाला, त्यांतल्या त्यांत शेतकरी जमातीच्या स्त्रीला मुळींच सहन झाला नाहीं. तिनें ह्याचंच भांडवल करून भोळ्या मानवांना पुण्याचं आकर्षण दाखविण्यासाठीं चक्क माझ्या गळ्यांत दावं घातलं, डोक्यावर एका पाटींत कवळभर चारा घेतला नि भाविकतेला साद घातली, 'गोमातेला चारा ... आज अमका वार, अमकी तिथि' नि भाबडे जीव ऐपतीप्रमाणें आणा, दोन आणे टाकून माझ्यासमोर चार काड्या धरूं लागले.

ह्यापेक्षांही माझी कुतरओढ झाली ती वेगळ्याच बाजूनें! मला मेलीला एवढा मानपान काय करायचा आहे! ह्यांना सारीं सारखं हिडीस-फिडीस करतात. कुठल्या आर्यस्त्रीला हें रुचेल, पटेल नि आवडेल? ह्यांचा स्वभाव तसा आहे घुम्या! बोलून दाखवीत नाहींत. आंतल्या आंत धुमसतात नि मग साऱ्या जगाचा राग काढतात माझ्यावर!

हिंदु समाज पुरुषप्रधान आहे. हिंदु धर्मही पुरुषप्रधान आहे. असं असतांना ह्यांचा पाणउतारा हा असा बुद्धिपुरस्सर करून आपण काय साधलंत, हें मला तरी उमजत नाहीं! विश्वाची रचना करतांना आपण ज्या कांहीं मूलभूत नि हिमालयाएवढ्या चुका करून ठेवल्या आहेत, त्यांतली ही एक आहे, ह्यांत शका नाहीं!

अतएव जगाला पोसणारी मी! पण ह्यांना मात्र उपास काढावे लागतात! मानभंगामुळें तडफडत राहावं लागतं. आमच्या वैवाहिक जीवनाचा आपण हा जो खेळखंडोबा केलात, त्याला एक तरी तर्कशुद्ध कारण आपण देऊं शकाल काय? पुष्पमालांनीं नि हळदीकुंकवानें मी भरलेली, तर ह्यांच्या मानेवर सदैव जोखड! मला हिरवागार चारा तर ह्यांना वाळलेला कोरडा पेंढा! मला सुग्रास भोजन! ह्यांना फुसका

कडबा ! 'तांबू ! तांबू ! ये घरीं' अशी माझी काव्यांत केलेली कौतुकाची ललकारी हवेंत विरते न विरते तोंच, कर्कश आवाजांतला 'हॅट्' हा शब्द गोठ्यांत माझ्या कानीं पडतो व माझं अंग मुक्या संतापानें थरथरतं.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर छत्रपति शिवाजीमहाराजांनीं सोन्याचा कळस चढविला. विजापुरांत त्या खाटकाला शासन केल्यावर, गोब्राह्मण-प्रतिपालक झाल्यावर, आम्ही अशा कांहीं रत्नखचित कोंदणांत बसवल्या गेलों, कीं जिथें खरोखर बरं वाटतं. तो गोठा राहिला दूर ! अत्यंत व्यापक अशा सनातन धर्माचं प्रतीक होण्याचा मान मिळाल्यापासून आमची धार्मिक नि नैतिक जबाबदारी वाढली. एखाद्या सामान्य अशा चतुष्पाद प्राण्यावर आपण केवढी भयंकर जबाबदारी टाकलीत देवा !

बरं, तसं पाहिलं, तर आमचं व्यक्तिमत्व ह्या मोठेपणाला साजेसं नाहीं ! वास्तविक सिंह आमचा राजा ! त्याला बाजूला सारलंत ! राजेमहाराजांच्या सिंहासनावरच काय ते त्यांचे सोन्याचे मुखवटे ! सिंहराजाला आपण हा मान दिला असतात ना, तर पराक्रमाचं प्रतीक म्हणून आपल्या औचित्याचं साऱ्या जगानें कौतुक केलं असतं ! जंगलचा अनभिषिक्त राजा ! सिंहपूजेमुळें आपला देशही विजिगीषु वृत्तीचा झाला असता. हजारों वर्षें भारतीयांच्या अंगीं सिंहाला शोभण्यासारखी पराक्रमी नि आक्रमक वृत्ति खिळली असती ना, तर दीडशें वर्षं अशीं लाजिरवाण्या गुलामगिरींत खितपत पडून काढावीं लागलीं नसतीं ! शक्ति नि तेज ह्यांनीं बलाढ्य झालेला भारत, जगाला शांततेचा मार्गदीप दाखवूं शकला असता ! जग बलवानांचं ! सिंहांचं ! पुरुषांचं ! गरीब गाईचं नाहीं !

झालं तें मात्र उलट ! माझी पूजा नि त्यांत हिंदु सहिष्णुतेची भर ! म्हणून हें अस्सं झालं ! होऊं नये तें झालं !

देवा, फार फार मोठी चूक केलीत आपण! 'देवनिवास' माझ्या पोटांत ढकलण्याऐवजीं जर सिंहाच्या पोटांत रिचवला असतात ना, तर हा देश सुवर्णभूमि म्हणूनच राहिला असता! नि तसा तो राहाता ना, तर सारं जगच सुखी झालं असतं! पण ... पण ... देवा, तेंच तर तुम्हांला नेमकं नको होतं, असं तर नव्हे ना?



# लागले का विंचू . . .

आपण मला केलंत एक सरसरता निखारा ! दिसणारी न दिसणारी इवलीशी नांगी ती काय, नि एवढ्या मोठ्या माणसाला थय्‌थय् नाचवते ती काय ? आमची नांगी आपली विषारी प्रहार करण्यास सदैव सज्ज.

आम्हांला हें भयंकर शस्त्र देण्यांत आपला कांहीं हेतु असावा ! मला वाटतं तो हेतु हाच, कीं प्रत्येक देशानें अहोरात्र दक्ष असावं. कसं ? . . . माझ्यासारखं ! नेहमीं शस्त्र उगारून हल्ला करण्यास तयार ! जगाचा इतिहास पाहिला, तर मला एवढंच आढळतं, कीं मानव हा मधूनमधूनच माझ्यासारखा रागवायचा. एऱ्हवीं सुस्तावलेला, आळशी नि सुखलोलुप ! त्याच्या तलवारी गंजल्या, बंदुका मोडल्या, तोफा म्हाताऱ्या होऊन निकामी झाल्या ! अणुयुगाची नांगी आतां उचल खाते

आहे ! छान आहे ! उशिरा कां होईना, माणसाला अक्कल सुचत आहे, हेंही नसे थोडकें !

माझी विचारसरणी ही अशी आहे ! नाइलाज आहे ! कारण हिंसा हा प्राणीसृष्टीचा स्थायीभाव आहे. नियतीचा नियम आहे. जगाचीही रहाटी आहे ! अहिंसेचं तत्त्वज्ञान आम्हांला वर्ज्य आहे ! अहिंसा निसर्गनियमाविरुद्ध आहे ! अतएव अनैसर्गिक आहे ! आम्हांला नांगी नसती किंवा असूनही विषारी नसती, तर जन्मतःच आम्ही किड्यां-मुंग्यांसारखे खलास झालों असतों. पण डोंगर हलविणाऱ्या उन्मत्त मानवाला एका फटकाऱ्यानें घायाळ करण्याची अमोघ शक्ति आमच्यांत असल्यामुळें जो तो आमचा आब राखून असतो !

पण दुर्योधनाचं मरण त्याच्या मांडींत, तसं आमचं नांगींत ! कारण तिच्यामुळेंच आमच्यावर चौफेर हल्ला होत असतो ! फार बारकाईनें विचार केल्यावर असं पटूं लागतं, कीं आपण ही दुष्ट नांगी आम्हांला द्यायला नको होतीत. मग आम्ही नांगी नसलेल्या एखाद्या खेकड्यासारखे झालों असतों नि अहिंसक जीवन व्यतीत केल्याचं आध्यात्मिक सौख्य उपभोगीत इथलं जीवन व्यतीत केलं असतं !

पण नाहीं ! आमच्या तें नशिबीं नव्हतं ! आमचा उद्दाम गर्व हरविण्यासाठीं आपण आम्हांला नारीजातीपुढें शरण यायला लावलंत, हा आमचा दाहक अपमान ! ती भिकारडी पाल ती काय, पण तिच्यापुढें साष्टांग नमस्कार घालायला लावलंत आम्हांला ! आम्हांला शत्रु निर्माण करायचाच होता, तर चांगला घसघशीत तरी करायचा ! पण नाहीं ! निर्मितींत वैचित्र्यच नव्हे, तर विनोदबुद्धि वापरण्याची आपल्याला हौस असल्यामुळें आपण आमचं गर्वहरण हें असं क्षुद्रपणें केलंत, हा आपला दुसरा प्रमाद !

नांगी हें अमोघ शस्त्र बहाल केल्याबद्दल आपण आमच्याकडून फार भयानक खंडणी वसूल केली आहे, ह्याची आपल्याला याद आहे का ? जन्मल्यापासून अंधारकोठडी ! काळोखांतलं एकाकी जिणं ! आयुष्यभर अज्ञातवास ! पांडवांना कुठें एक वर्षभर अज्ञातवासांत राहावं लागलं, तर केवढा गहजब केला सर्वांनीं. आमच्यावरच्या अन्यायाला वाचा कोण फोडणार ! आमच्या वास्तव्यांत अज्ञातवास नि वानप्रस्थाश्रम ह्यांच्यामधला हठयोगाचाच भाग जास्त आहे, हेंही आपल्या ध्यानीं-मनीं नसावं ! साहजिकच आहे !


माणूस मोठा विचित्र. त्याला माझ्या वेदना सहन होत नाहींत, पण त्यानें आपल्या सुपीक डोक्यांतून माझ्या वेदनांवर म्हण मात्र चांगली बसविली. त्याच्याच भाईबंदांपैकीं एखादा बेचैन झाला म्हणजे तो त्याला म्हणतो कसा, 'लागले का विंचू ?' देवा, काय बुद्धि देतोस पण तुझ्या आवडत्या मानवाला !

आमच्या रचनेंत मात्र आपण असामान्य कौशल्य दाखवलंत, पण वांधा केला नांगीनें ! खडकाखालीं, कपारीच्या आडोशाला बसून आम्ही विचार करीत बसतों. केव्हां केव्हां वाटतं, देवा, निदान हा आमचा अखेरचा तडफडता संदेश तरी भारतवर्षाला कळवा आपल्या देववाणीनें !

जग बळाढ्यांचं ! प्रखर, विषारी प्रतिहल्ला चढविण्याची जबरदस्त तयारी असल्याशिवाय राष्ट्र जगत नसतं ! प्रत्येक राष्ट्राला आपल्या संरक्षणासाठीं एक शक्तिमान्, प्रभावी, शत्रुहिंसक ताकद असावी लागते. पोलादी मनगटापुढें सारे चळवळ कांपतात. आम्हांला जशी नांगी, तशी देशाला स्वसंरक्षणासाठीं एक राक्षसी, विषारी, वज्रासारखी रिपुसंहारक शक्ति असावी लागते. तत्त्वज्ञानानें आत्मा वांचूं शकतो. देश नाहीं वांचत ! प्राणघातक हल्ला करणारा शत्रु आपल्याइकडले सांस्कृतिक वारशाचे ग्रंथ पाहून मागें परतत नसतो ! त्याला हवा असतो भीमटोला ! आपण

युद्धपिपासु व्हावं, असं नाहीं आमचं म्हणणं ! आमचं म्हणणं एवढंच, कीं आपल्या देशाची नांगी, प्रतिकारशक्ति, इतकी अचाट असली पाहिजे, कीं मग कुणाचीही आमच्याकडे नुसतं पाहाण्याचीसुद्धा छाती होतां कामा नये ! असं प्रथम बलवान्, सामर्थ्यवान्, शक्तिमान् व्हावं नि मग शांतिजप जपत राहावं !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे, वाचनालय शाखा.
अनुक्रम .................. वि....................
क्रमांक................नोंद दि..............



# पाण्यांत न राहातां माशांशीं वैर

आमचं निवासस्थान हेलकावणारं, फेसाळणारं, उफाळणारं! स्थैर्य आमचा शत्रु नि मानवही! हिरवट, निळसर अथांग सागरांत आमचा इवलासा देह, प्रचंड लाटांशीं टकरा देत, आम्ही रिझवीत असतों. एका काळोख्या दैदीप्यमान् विश्वांत आमचा विहार चाललेला असतो. भारतीय जनतेला लाजवील एवढा जातिभेद! त्याचा अहर्निश संकर!

देवा, कांहीं बाबतींत मात्र आपण कृपाळू झालांत, ह्यांत शंका नाहीं. पाण्यांतलंच आमचं जीवन! पण सर्दी, पडसं आम्हांला ठाऊक नाहीं! जाळ्यांत आमचे प्राण खेचणारा कोळी एका कोटींत एक

ह्या प्रमाणांत आमच्या जातभाईंना पकडत असावा ! स्वच्छंद पोहायला पाण्याचा तोटा नाहीं ! तसं आमचं एकंदरींत ठीक चाललंय् ! पण तरीसुद्धा आमचा जीव — मासेच आम्ही — आपला तडफडतोय् !

जलजीवनाचा उपभोग घेत असतांना भूभागावर प्रच्छन्नपणें हिंडण्या-फिरण्याची मुभा आपण आम्हांला ठेवलीत नाहीं, हा आपला पहिला प्रमाद ! किंबहुना किनाऱ्याला लागलों, कीं प्राण गेलाच ! ह्या बाबतींत आपण फार मोठा पक्षपात केलात, नाहीं का ? समुद्रांतले खारट पदार्थ खाऊन खाऊन आमच्या जिभेची चवच जाते ! जमिनीवर येतां आलं असतं, तर फळांनीं भरलेल्या वृक्षांवर चढून मधुर रस चाखला असता. हापूसच्या शेंदरी, पिवळ्या आंब्याला आमच्या रुपेरी शेपटानें कुरवाळलं असतं. काळ्याभोर तुरट जांभळांना आमचा डोळा भिडवला असता. परिपक्व फणसाच्या कांटेरी देहावर आमचा देह घासून अंग खाजवून घेतलं असतं. आंबट बोरं घेऊन लुटूपुटीची लढाई केली असती. पारंब्यांवर झोके घेतले असते. ताडगोळ्याचं मधुर पाणी झाडावरच प्यायलों असतों. माडाच्या झींवळ्यांवर बसून उंचावरून सागराची शोभा पेन्शनरी थाटांत पाहिली असती. पण नाहीं.

आपण मज्जाव केलात तो असा, कीं किनाऱ्याला शेपूट तर टेक, प्राण गेलाच म्हणून समज ! माणूस सागरांत मरतो, आम्ही भूमीवर ! आहे त्या पृथ्वीची विभागणी करतांना आपण गल्लत केलीत ह्यांत शंका नाहीं. मुळांत पृथ्वीच्या जवळजवळ तीन चतुर्थांश सागर निर्माण करण्याची मुळींच आवश्यकता नव्हती. गोड्या पाण्याचा पावसाळा व्हावा, म्हणून खाऱ्या पाण्याचा एवढा सांठा कशाला ? सर्व समुद्रांत जेवढं पाणी आहे, त्याच्या काय हिश्श्यानें पाऊस पडतो ? वरवरचा पृष्ठभाग तापतो नि त्याचे वाफेचे ढग होऊन पर्जन्यधारा कोसळतात. मग भूभागाचा एवढा नाश करून इवल्याशा पावसाकरितां एवढे महाप्रचंड

सांठे कशाला निर्माण केलेत ? त्यामुळें आमचं जीवन मात्र विस्कळीत नि गुंतागुंतीचं झालं ?

देवमाशापासून तों डोळ्यांना दिसणार नाहीं अशी अगणित वीण समुद्र व्याला. माणसाची सवय मग आम्हांला साहजिकच लागली. आमच्यांत सारखीं युद्धंच लागलीं. सागराखालचं विश्व म्हणजे एक चिरंतन कुरुक्षेत्र ! इथें युद्धाला कारण लागत नाहीं ! इथें 'तस्मात्' नाहीं ! इथें 'इति चेत्' आहे ! मोठ्याला छोट्याची चाहूल लागायची खोटी, कीं मोठ्यानें छोट्याचा ग्रास केलाच !

जितकं खोल जावं, तितकी जलसृष्टि विचित्र. मोठमोठे मासे, ऋषि-मुनींच्या थाटांत, अभेद्य अंधारांत, विश्वचिंतन करीत संथपणें तरंगत असतात. मधूनच त्यांना प्रायाणाम करायची हुकी येते नि त्यांनीं तसा केल्यावर कांहीं बुडबुडे त्या काळोख्या दुनियेंत क्षणभर रुपेरी गोल चमकावितात. पुनश्च ध्यान, मनन, चिंतन चालूच ! ह्यांचा दिनक्रम, खरं म्हणजे तिमिरक्रम, एकमार्गी ! त्यांचीं युद्धं झालीं, तर समुद्राचा तळ हादरल्यासारखा वाटतो. नि तीं होतातच. भूक सर्वांनाच आहे. देहधर्म सुटलाय् का कुणाला ?

प्रशान्त सागरांत अशान्त, तापलेलं, युद्धपिपासु वातावरण निर्माण करण्याची चूक आपण केलीत, असं आम्हांला प्रामाणिकपणें वाटतं. सजीवसृष्टीची रचना नि वृद्धि मृत्यूच्या अव्याहतपणावरच अवलंबून असते, हा आपला नियम वाजवीपेक्षां फाजील कांटेकोरपणानें, किंबहुना क्रौर्यानें आपण सागरप्रांतीं जारी केला आहे. ही जाणीव आम्हांला बेचैन करते नि भक्तिभाव भर सागरांतही आटतो. आमच्या एका पूर्वजानें पृथ्वीचं एवढं प्रचंड ओझं एकदा आपल्या टणक पाठीवर वाहिलं, त्या उपकाराची फेड आपण कांहीं फार चांगल्या प्रकारें केलीत नाहीं, असं मोठ्या खेदानें म्हणावं लागतं. आपण सांगत सुटलां होतां, कीं जलदेवता

आमच्याकडे राहातात! त्या लावण्याच्या मूर्ति आहेत. त्यांचा अर्धा देह आमच्यासारखाच असतो. म्हणून आपुलकीनें आम्ही त्यांचा शोध इतकीं वर्षे करीत आलों! पण व्यर्थ! एखादी जलपरी नाहीं, जलदेवता नाहीं! कांहीं नाहीं! किनाऱ्याजवळ येऊन, पाण्यावर डोकं काढून, औद्धत्यानें एखाद्या वेळीं भूभागावर नजर टाकतों, तेव्हां एखादी मत्स्यगंधा जाळं आवरून लुटूलुटू धावतांना दिसते तेवढीच!

अनादिकालापासून यमराज कोळ्याच्या रूपानें आम्हांला भेट देतात. जाळं खासकन्, सफाईनें फेकलं जातं. पाण्यावर चपक् असा आवाज होतो. तो ऐकल्याबरोबर यमराजाचा ढोल वाजल्याचा भास होऊन आमची पळापळ सुरू होते. कांहीं अडकतात जाळ्यांत! कांहीं मानवाच्या क्रूर गळांत! यमपाश फेकणारा कोळी हलके हलके जाळं ओढूं लागतो. तें वर ओढतांना त्याला जितकं जड लागतं, तितका त्याचा आनंद तो एका काळ्याकुट्ट हास्यानें प्रदर्शित करतो. जाळ्याच्या टणक दोऱ्यांत आमचे प्राण आवळले जात असतात! पाण्याच्या पृष्ठभागाशीं अखेरचा संबंध तुटतो. जाळ्यांतलं उरलं सुरलं पाणी दोऱ्याच्या छिद्रांतून ओसंडतं आणि मग एक तळपती, तडफडती मोट आनंदाच्या कल्लोळांत वर खेचली जाऊन, खडबडीत पृष्ठभागावर काचकन् एकदा आपटली जाते! 'कवरे मासे गावले?' असा चीत्कार हवेंत घुमतो. इकडे जीव कासावीस होतो आमचा! तडफडून, तडफडून आम्ही आंतल्या आंत उड्या मारतों! अखेरची प्राणांतिक धडपड! थोड्याच वेळांत आमचं इवलंसं रुपेरी मुख उघडून आम्ही पंचत्वांत विलीन होतों. कुणाच्यातरी भोजनांतील त्या दिवसाचा ताजा तडफडीत पदार्थ म्हणून मग आमची अंतिमयात्रा फाटक्या टोपलींत हिंदकळत होते. सर्व जगाला शांतीचा संदेश देणारा मानव आमचे तुकडे तुकडे करवून घेतो नि पोटभर जेवणानंतर ढेकर दिल्यावर आम्ही कसे ताजे तडफडीत होतो, ह्याचं रसभरीत वर्णन,

रसिकतेनें, तांबूल चघळतां चघळतां पोटावरून हात फिरवीत, फिरवीत करतो नि मग संपते आमची दर्याभरी कहाणी ! आणि ह्या कहाणीची फलश्रुति हा कृतघ्न मानव सांगतो, 'पाण्यांत राहून माशाशीं वैर करूं नये.' अरे, पाण्याबाहेर जर तुझं आमच्याशीं इतकं वैर, मग परमेश्वरानें तुझी पाण्यांत सोय लावली असती तर बघायलाच नको होतं. परमेश्वरा, तूं खरंच दयाळू आहेस. ह्या मानवाला पाण्यांत बुडवितलंस तरी चालेल, पण त्याला पाण्यांत पाठवूं मात्र नको.

हा आपल्याला शांततेचा उपासक म्हणवणारा माणूस आपण निर्माण केलेल्या प्राणीसृष्टीचा सारखा संहार करीत आहे. त्याचं लक्ष आतां सागराच्या तळाशीं लागलं आहे. शेंकडों, हजारों पुरुष खोल पाण्यांत तो बुडी मारतो. महासागराच्या तळाशीं तो महास्फोटक असे अवजड पदार्थ पेरीत आहे ! आणखी एखादं युद्ध झालं, कीं स्फोटक गोल धाडकन् फुटतील नि पृथ्वीला कदाचित् भला मोठा तडा जाईल ! ह्या असल्या उपद्व्यापी, विध्वंसक, उन्मत्त माणसाला भूलोकींचं साम्राज्य नि आम्हांला ते तसलं तडफडतं मरण नि खांडोळीं ! खासा न्याय आहे देवा ! घ्या आतां मत्स्यावतार !



# आडवं मांजर

बुद्धिदात्या गजाननाचीं शंभर वाहनं उध्वस्त केल्यावर आम्ही काशीयात्रेस जातों, ह्या प्रवादानें मानवानें आमची टिंगल केली आहे. आम्ही सहजगत्या जरी मार्ग ओलांडीत असलों, तरी हा मूर्ख मानव 'झालं! गेलं मांजर आडवं ... आतां वाट लागली कामाची!' अशी स्वतःची अजागळ गैरसमजूत करून, आपल्या अकार्यक्षमतेचं खापर आमच्या डोक्यावर फोडतो.

देवा, आपल्यासारखा माणूस, तसे वाघासारखे आम्ही. पण आमची ही प्रतीकृति आपल्यापेक्षां लाखों पटींनीं श्रेष्ठ नि सरस! वाघाला

आक्सलं, तर आम्ही होऊं! आम्हांला खूप ताणलं, तर वाघोबा होतील. आपलं तसं होईल, असं वाटत नाहीं!

आपण आमच्यांत कांहीं विचित्र विरोधाभास निर्माण केले आहेत नि त्यामुळेंच आमचं जीवन दुःखी झालं आहे. मांसाहार हा आमचा स्थायीभाव! पण दुग्धप्राशनाची जबरदस्त चटक आम्हांला लावून आपण पहिलं त्रांगडं उभारलंत! हिंसेच्या रक्ताळलेल्या राज्यांतून आपण एका क्षणांत आम्हांला सात्त्विक, शुद्ध नि शुचितासाधनाच्या मार्गांत आणून सोडतां नि त्यामुळें आमचा मोठा कोंडमारा होतो. एखाद्या नरमांसभक्षक राक्षसाच्या योनींतून आम्ही देवयोनींत, निदान ऋषिमुनींच्या जातकुळींत प्रविष्ट होतों. चोरून, जिभल्या चाटीत दूध पीत असतांना आमच्या मिटलेल्या डोळ्यांपुढें जें स्वप्न तरंगत असतं, तें आमच्या तीक्ष्ण सुळ्यांत तडफडणाऱ्या पुष्ट उंदराचं! म्हणूनच म्हणतों, देवा, कीं हठयोगी पुरुषाची विरक्ति नि भोगवादी चक्रवर्ति राजाचा मोह, ह्यांचं विलक्षण रसायन करून, आपण आमची मानसिक कुतरओढ केली आहे. विरोधाभास हा जीवनाचाच महत्त्वाचा भाग समजून, संधिसाधूपणा करायला, दुटप्पी वर्तन करायला नि वारा येईल तशी पाठ फिरवायला आपण आम्हांला आप्पलपोटा मानव समजलांत कीं काय?

हिंस्र असून माणसाळायची आपण आम्हांला खोड लावलीत, हा दुसरा प्रमाद! दुधाच्या आशेनं आम्ही हा लाळघोटेपणा करतों, हा आमच्या जिव्हालौल्याचा विजय आहे! पण माणसाच्या संगतीनें आम्ही किती बिघडतों, ह्याची आपल्याला कल्पना नाहीं देवा!

माणूस हा एक अस्वच्छ प्राणी आहे! त्याच्याजवळ बसायलासुद्धा आम्हांला घाण वाटते. इतका सुंदर देह त्याला आपण दिलात! पण त्याला कुठें आहे त्याची कदर! तो आपला साऱ्या जगाची घाण उपसत असतो. तिथें आमचं कसं जमणार? त्या द्विपादी दुर्गंधीच्या आगरांत

आपण आम्हांला डांवून ठेवतां. हलक्या, दबक्या पावलांनीं आम्ही त्याच्या घरीं वावरत असतों. माणसाचा आमच्यावर विश्वास नाहीं, आमचा त्याच्यावर नाहीं ! घरांतले मूषक नाहींसे करणारं यंत्र ह्या निर्जीव भावनेने तो आमच्याकडे पाहातो ! निवाऱ्याला छप्पर नि वेळेला ( चोरून हल्ला मारलेलं ) दूध देणारा प्राणी म्हणून आम्ही त्याच्याकडे पाहात असतों.

मोठमोठ्या राष्ट्रांतले संबंध वरवर जसे गोड नि औपचारिक असतात, तीच गत इथें असते. तो त्याच्या बेहोषींत असतो. आम्ही बोकाध्यान लावून बसतों. मोक्षप्राप्तीकरतां त्याची धडपड. ब्रह्मानंदासाठीं त्याची तडफड ! हळूच सटकणाऱ्या उंदरावर झडप घातल्यावर आमचा ब्रह्मानंद साकार होतो.

जंगली नि नागरी ह्या दोन्ही प्रवृत्तींची आपण आमच्या निर्मितींत फार मोठी गल्लत केली आहे, हा मोठाच दोष ! त्यामुळें होतं काय, कीं जंगलच्या राजाचा स्वच्छंद विहार ना आमच्या नशिबीं, ना नागरी सुसंस्कृत वागणुकींतलं सौजन्य ! बरं ! नाहीं म्हणावं, तरी माणसाची हातचलाखी नि सफाई आमच्यांत नसल्यामुळें हीं दोन्ही सोंगं वठवतां वठवतां नाकीं नऊ येतात, दहा म्हटलं तरी चालेल !

खरं म्हणजे ह्या सफाईदार माणसाचं नि आमचं नातं, म्हणजे आमचं नि मूषकाचं असतं तेवढंच ! ह्या माणसानें आमचा मान कधींच ठेवला नाहीं ! मग आम्हीं तरी त्याचा कां ठेवावा ?

देशाची वर्तणूक आमच्यासारखी असावी. त्यानें दबून राहावं ! संधि मिळतांच हल्ला करावा ! एऱ्हवीं डोळे मिटून ध्यानस्थ बसावं ! शत्रूला धरावा नि सोडावा, पण अंतीं मारावाच ! चाणक्यनीतीचा आविष्कार मी माझ्या दैनंदिन जीवनांत जो दाखवितों, तो स्वतःला

अतिशहाणा समजणाऱ्या ह्या माणसाला कसा कळत नाहीं कुणास ठाऊक ?


आमची म्यॅंव-म्यॅंव शांततेची. भाषा शांततेची. पण पंजाचा फटकारा जीव घेणारा. डोळे मिटून बसूं. पण साऱ्या जगाला न्याहाळूं नि योग्य संधि आली, कीं यमउडीच !

माणसाला नाहीं तें शहाणपण आम्हांला दिलंत देवा ! पण त्याचा उपयोग काय ? शहाणपणाचं, सूज्ञपणाचं, बुद्धीचं जें वांटप आपण केलंत, तें अगदींच अव्यवस्थितपणें, एवढंच सौम्य शब्दांत सांगतों. शहाण्यांना शब्दाचा मार जाणवतो, असा समज आहे नि त्याचाच आधार घेऊन मी आपल्याला चार हिताचे शब्द, डोळे मिटल्या मिटल्या, एखाद्या धर्मोपदेशकाच्या अभिनिवेषानें सांगण्याचा प्रयत्न करीत आहें.

आक्रमक प्रवृत्ति नि बचावाचं धोरण, प्रखर बुद्धि नि चाणक्यनीति, हिंसा नि अहिंसा, ह्या परस्परविरोधी गुणावगुणांचा पांढरा शुभ्र सजीव गुंडाळा जो आपण उत्पन्न केलात, त्यामुळें आमच्या जातीला केवढ्या भयानक संकटांना तोंड द्यावं लागतं, ह्याची आपल्याला कल्पना आहे का ? माणसाची सतत उगारलेली काठी, इतर प्राण्यांचा उपद्रव, दुधाचं दुर्भिक्ष्य, आम्हांला मोहमार्गाकिडे नि हिंसेकडे खेचून नेणारा मूषक वर्ग व त्याच्या संहारापासून आमच्या मनाची होणारी सात्विक तळमळ, जीवनांत निश्चित असं कार्यच नसल्यामुळें गुलाम देशांतल्या जनतेंत उत्पन्न होणारी बेताल वृत्ति, स्वयंपाकघरांतल्या चुलीजवळच्या उबेजवळ प्रदीर्घ काळ केलेलं पण फुकट गेलेलं आत्मचिंतन, एक प्रकारचा सामाजिक बहिष्कार आपल्यावर टाकला गेला आहे ह्या भावनेमुळें हरिजनांसारखी हळुवार झालेली मनोवृत्ति, ही व आणखी अशी लांबलचक यादी मी आपल्याला सादर करूं शकेन देवा !

पण लक्षांत कोण घेतो ? जीवसृष्टींतलं, आपल्या अन्यायामुळें प्राणीसृष्टींत मिळणारं हौतात्म्य हें हौतात्म्य राहात नसून, त्याला नाक्यावरल्या गुंडांच्या मारामारीचं स्वरूप येतं, ह्याची आम्हांला जाणीव आहे. आपला कारभारच उरफाटा आहे. जबरदस्तांना आपण जास्त सामर्थ्यवान् करतां ! व्याघ्रराजाला आणखी बलवान् करायचा नि आम्हांला हें असं करून ठेवलेलं ! नुसतं ताटाखालचं मांजर !

त्यापेक्षां आम्हांला पूर्ण शाकाहारी करून केवळ सात्त्विक प्रवृत्तींचा परिपोष आपण आमच्यांत करविला असता ना, तर दुष्प्रवृत्तींनीं खचून जाणाऱ्या आपल्या अंधेरी दुनियेंत आमच्या घाऱ्या दुनियेंतले प्रकाशझोत पडले असते व त्यानें सर्वांचा मार्ग उजळून इतरेजनांना मार्गदर्शन झालं असतं ! निदान आपण आम्हांला एवढं बुद्धिमान् करायला नको होतं ! म्हणजे डोक्याला हा एवढा व्याप नसता झाला ! पण ... पण देवा ! तुमचा खेळ झाला नि जीव गेला ... उंदरांचा !



# काय रे ! घोड्यावरसा ?

आमच्यामुळें जगाचा इतिहास बदलला, हा भलता मोठेपणा आपण ह्या श्वापदाला दिलात, ही एक अक्षम्य चूक आहे. जगाचा इतिहास बदलवायला आम्ही काय क्लिओपात्रा लागून गेलों आहोंत ? पण त्या सौंदर्यसम्राज्ञीच्या नाकाच्या शेंडेनक्षत्रामुळें जितका हाहाकार झाला असा प्रवाद आहे, त्यापेक्षांही आमच्या फुरफुरत्या दौडीमुळें झाला, असा आमचा दावा आहे.

गेल्या पांच हजार वर्षांचा इतिहास चाळण्याची आपण तसदी घेतलीत, तर आपल्याला उमजेल, कीं देशाच्या सरहद्दी बदलण्याचं काम आमच्या पळण्याच्या वेगानेंच झालं आहे. ज्याचं वाहन वेगवान् तो जगज्जेता ! अश्वमेधयज्ञापासून ही प्रथा चालू आहे. आमच्यांतला

उच्चवर्णीय जेव्हां आपली धवल काया राखाडी मातींतून नि निसरड्या दरडींतून सळसळत नेत असे, तेव्हां पाय ठेवूं ती भूमि आमची, असा खाक्या होता. राजाश्रय प्रथमपासून मिळाल्यामुळें वैभवाची झूल अंगावर पहिल्यापासूनच ! पण राजमान्य असून लोकमान्यही होतों. भटक्या भिकाऱ्याचा आसरा आम्हीच ! राजापासून रंकाची सेवा केली, पण बेइमानी नाहीं !

मानव समाजांतला कलह पेटविण्यास आपण आम्हांला कारणीभूत केलंत, ह्याचं आम्हांला तीव्र दुःख होतं. पुराण-पुरुषांच्या भराऱ्यांनंतर सिकंदर, पौरस, चेंगीझखान ह्यांच्या रक्तरंजित दौडीपर्यंत आपण इतिहासाची पानचाल करतों. आमच्याशिवाय हीं हत्याकांडं कशीं बरं झालीं असतीं ? आमच्यामुळें जगाचा इतिहास बदलला, असं आम्ही म्हणतों, तें ह्यामुळें.

पण समाधान एवढंच, कीं आमच्या टापांच्या तालावर मऱ्हाठशाही जागी झाली. निद्रिस्त, घोरत पडलेला सह्याद्रि जागा झाला. जगाचा राजा ज्यांनीं व्हावं ते आमचे शिवछत्रपति वैनतेयासारख्या विजयी भराऱ्या मारूं लागले. आमचं साम्राज्य झगमगलं ! आमचा आधार घेऊन विशाळगडावरून महाराजांनीं जी दौड मारली तेव्हां, नि आग्र्याच्या यमसदनांतून निसटल्यावर खूप दूर गेल्यावर, महाराज आमचा आसरा घेऊन स्वतंत्र झाले तेव्हां, जीवनाचं खरं सार्थक झालं असं वाटलं !

मागल्या महायुद्धापर्यंत आमचा डौल थोडा फार टिकला होता. जागतिक युद्ध झालं नि संस्थानिकांसारखे आम्ही विलीन झालों आहोंत, कायमचेच ! आमची अबलख जात ! पंचकल्याणी ! आतां गिरिकंदरांतून राक्षसी वेगानें पळणारे अजस्र रणगाडे मृत्यु ओकीत असतात ! रणधुरंधर योद्धयांना आम्हीं रणभूमीवरून वाहून नेलं नि वाहून नेत असतांना अंतरींच्या विशुद्ध भावनेमुळें जो अमर्याद आनंद झाला, तो आतां

कायमचा लोपला ! तल्वारीला तल्वार भिडत होती ! बाहूला बाहू ! आतां जुंपलंत आम्हांला मावळत्या घोडागाडीला नाहींतर टांग्याला. शत्रूची गर्दन तल्वारीच्या एका फटक्यानें हवेंत उडविणारे हात आतां इतके नागरी नि अहिंसक झाले आहेत, कीं टांग्यांत बसल्यावर काखोटीस मारलेल्या मुळ्याच्या जुडींतला एखादा मुळा मोडून खावासा वाटला, तर तो मोडतांनाही खाणाऱ्याला 'जोर' करावा लागतो !

आपण आमचा हा अधःपात नेपोलियनी थाटाचा केलात, ही आमची दारुण व्यथा. एवढं राजवैभव उपभोगल्यानंतर हें असं काय ? हॅट, हॅट ! चाबकाचा फटकारा ! डोळ्यांवर झडपं ! मानहानि ! तिळपापड होतो अंगाचा ! वाटतं, कीं गाडी उलथवून टाकावी ! उलथवून टाकावा ह्या कृतघ्न माणसाला ! जगांत यांत्रिकीकरण होणार आहे, हें आपल्या दूरदृष्टीला दिसूं शकलं नव्हतं का ? रत्नखचित जीन घातलंत, त्यावर आतां चाबकाचे फटकारे !

सुखी असायचं आमचं साधंसुधं जीवन ! माळरानावर हवं तेवढं चरावं ! कळपांत राहून आपसांत लाथाळी करावी ! आज इथें तर उद्या तिथें ! कंड आल्यास अंग कपारीवर घासावं ! कुठल्यातरी ओहोळांत डुंबावं ! मन मानेल तेवढं खिंकाळावं ! त्या खिंकाळण्याचे प्रतिध्वनि ऐकून मानेला हिसडा देऊन नि शेपटाची हालचाल करीत पुढचे खूर दणाणकन् आपटावे ! दर्भ-भक्षण चालूच ! उभ्या उभ्याच झोप नि हें असं उभ्या उभ्याच जिणं जगावं ! साधं ! एकमार्गी ! हठयोगी ! !

पण दोरखंड घेऊन माणूस येतो नि नेतो खेचत आम्हांला. माणसाळल्यावर लाड होतात ! लोखंडाचे चणे खाल्ल्यावरच मग चांगला हरभरा मिळतो ! त्याची गुलामगिरी पतकरली, कीं आमचं नेकजात इमान जागं होतं ! नि मग प्राण गेला तरी सोडत नाहीं धन्याला !

काळोख्या बुरुजाखालीं, उत्तर रात्रीं कुणाचा तरी आकस्मिक खून करायचा कट कोणीतरी रचीत असतो. आमच्या मनाला पटत नाहीं तें ! पण बेइमानी नाहीं ! जिवाला जीव दिला आजवर ! देवा, ह्या तपश्चर्येचं फळ काय ?

आपण पवित्र गीता सांगितलीत कुरुक्षेत्रावर ! तेव्हां आम्ही होतोंच त्या रथाला ! आपल्या शिकवणुकीप्रमाणें आम्हीं आजवर निष्काम कर्मयोग आचरला ! कर्तव्यांत कधीं कसूर केली नाहीं ! आमचं काय बरं झालं ! मोक्ष मिळाला तो किल्ल्याच्या बुरुजावरून उडी मारली तेव्हां ! काल्पीनदीच्या कांठीं ! ' एरव्हीं ' कुत्र्याच्या मोतानें मरण ! तोंडाला फेस यायचा धन्याला पळवितां पळवितां ! ऊर फुटायचा ! ! आम्हीसुद्धा ' फुटो हें मस्तक, तुटो हें शरीर ', वगैरे आमच्या देवासाठीं, आमच्या धन्यासाठीं सारं कांहीं केलं ! पण ...... ? त्याची बूज धन्याला नाहीं. आपण तरी राखा !

पुराण काळापासून हा एवढा असा आमचा मोठा मान असतांनाही साधासुधा माणूस आमचा उल्लेख करतो तो मात्र अगदीं तुच्छतेनें ! घाईघाईनें निघालेल्या एखाद्या नवयुवकाला थोपवून एखादा झोपाळू जांभई देत देत, झोपेंतच विचारतो, ' काय रे ! घोड्यावरसा ? ' केवढी ही त्या नवयुवकाची नि पर्यायानें आमची हेटाळणी ? अशाच एखाद्या चांगल्या तगड्या जवानाला उद्देशून एखादा शिष्ट जेव्हां ' काय घोड्यासारखा वाढला आहेस रे ! ' असं बोलतो, तेव्हां आम्हांला मनस्वी दुःख होतं. अपमानानें अंगाची लाहीलाही होते. आम्ही खाड् खाड् टापा आपटतों, जोरानें खिंकाळतों ! मग शांत होतों आम्ही नि विचार असा येतो मनांत, कीं हे मानवा, नाहीं माणसा, तूं आमच्यासारखा वाढूं शकणार नाहींस ! आमची मानसिक वाढ सकस आहे. आम्ही प्रेमळ आहोंत, कृतज्ञ आहोंत, पाणीदार आहोंत ! तूं क्रूर आहेस, दुष्ट आहेस,

मूर्तिमंत कृतघ्नतेचा अवतार आहेस नि चंचल ह्या अर्थानेंच काय तो पाणीदार आहेस !'

आपण केलेली आणखी एक घोडचूक आहे ! घोडचूक म्हणजे महाघोडचूक ! मानवसमाजांत आपण वर्णभेद निर्माण करून जगांत जो कोलाहल माजवून ठेवला आहे, तेवढ्यानें भागलं नाहीं म्हणून कीं काय, तो वर्णभेद आपण आमच्यांतही घुसविलात ! शुभ्र, अबलख, चलाख अरबी अश्व हे आमच्यांतले साम्राज्यवादी गोरे नि बाकीचे आशिया आफ्रिकेंतले ? कां ? देवा, कां हा उपद्व्याप केलात ? निःपक्षपातीपणा हा जर आपला स्थायीभाव, तर आमच्याच बाबतींत हा असा क्रूर अन्याय कां बरं केलात ? शुभ्र धवल रंगाचा जगांतच मान फार ! आमच्यांतले ते पांढऱ्या पायांचे भाग्यवान् अशा वरीं नांदतात, कीं जिथें त्यांनीं हरभऱ्यांऐवजीं मोत्यांचा चारा चरला, तरी कुणी तिथें कुरकुरणार नाहीं ! पण असे अगदीं थोडे हो ! सरंजामशाही, सरदारकी, पाटीलकी, वतनदारी, जमीनदारी, जसजशी गेली, तसतसं आमचं झगमगतं जिन काळवंडलं. सोन्याच्या रथाला जुंपलेले आम्ही ! तो जाऊन 'च्यार आने सवारी' वाला खडखडता टांगा नशिबीं आला ! ! ज्या पुष्ट देहावर तडफदार दणकट पंजा घोडदौड मारल्यावर मायेनें फिरायचा, तिथें आतां हातांत साफ पेटती विडी घेऊन, घसरलेलं जिन सावरणाऱ्या टांगेवाल्याचा घामट, कृश हात फिरतो नि आमचं अंग शहारतं ! पुराण, इतिहास, साम्राज्यशाही, राजेशाही, सरदारकी, वतनदारी, पाटीलकी, ह्या सर्वांचाच कायाकल्प झाल्यामुळें व आमची मात्र काया होती तशीच राहिल्यामुळें आमच्या जीवनांत एक महाभयानक असा विरोधाभास निर्माण झाला आहे !

नाहीं म्हणायला एकच क्षेत्र अजून आहे, जिथें आमचा मान मोठा ! पण तो अशा ठिकाणीं, कीं जिथें गोरगरिबांच्या संसाराची माती होते. साफ माती ! ! नि म्हणूनच हा इथला मोठेपणा शापित

आहे ! तिथें आम्ही जेव्हां पहिल्या नंबरासाठीं बेगुमानपणें पळतों, तेव्हां आमच्या टापांखालीं शेकडों संसार चुरडले जात असतात ! कित्येक घरांवर येणाऱ्या जप्त्यांचे कागद आमच्या टापांच्या बेचांगळींत घेऊनच आम्ही भरधाव धावत असतों. होता तो मोठेपणा नि वैभव, देवा, घेतलंत हिरावून नि हा तळतळाटाचा मान दिलात ! केवढा हा अन्याय ! अश्वमेधापासून रेसकोर्स ! धार्मिक नि ही सामाजिक उत्क्रांति किती भयानक आहे, नाहीं ? नि ह्यालाही जबाबदार आपणच !

मराठी ग्रंथ ... वाचनालय शा...
अनुक्रम ... वि ...
क्रमांक............नोंद दि............

## परमेश्वर उवाच ।

माझ्या बालमित्रांनो, आपण सर्वांनीं आपापलीं अंतःकरणं मनमोकळेपणानें उघडीं केलींत, हें अगदीं उत्तम झालं ! तुम्हां सर्वांच्या मनांत काय खळबळ चालली होती, ह्याची मला संपूर्ण जाणीव आहे ! ज्यांना आपण चुका म्हणतां त्या मुळांत चुकाच नाहींत ! इथेंच तुमचं चुकतं ! पण बालकांनो, आतां मी काय सांगतोय् तें नीट ऐका बरं ! हाँ ! शेपट्या वळवळायच्या नाहींत ! खिंकाळ्या बंद ! गुरगुरायचं नाहीं ! चीत्कार नकोत ! चूप बसा बरं ! हाँ ! अस्सं !

मीं सृष्टि निर्माण केली. फार विचार करून केली. ती निर्माण करतांना मला काय यातायात झाली, ह्याची कल्पना नाहीं तुम्हांला. जेवढं दिसतंय् ना, त्याच्या अनंतपट मीं निर्माण करून ठेवलंय्! आकाशांत कोट्यवधि सृष्टि आहेत. त्या तुम्हांला कुठें माहीत आहेत? कोटि कोटि सूर्य आहेत! अगणित विश्वं आहेत! हें सर्व तयार करतांना शीण फार आला, पण कशांत कसूर केली नाहीं.

प्रत्येक प्राण्याचा अवयव असा केला, कीं तो तिथें असावाच! नसता तर प्रलयच झाला असता. समजा, माणसाच्या डोक्याच्या मागच्या बाजूला मीं त्याला आणखी एक डोळा दिला असता, तर काय हाहाकार उडाला असता, ह्याची तुम्हांला कल्पना तरी आहे का? आपल्या मागें आपलींच माणसं आपली किती क्रूर थट्टा करतात, हें माणसाला दिसलं असतं नि मग सारखे खून नि मारामाऱ्याच झाल्या असत्या! शंकराच्या रूपांत जेव्हां तृतीय नेत्र मी उघडतों, तेव्हां जो प्रलय होतो ना, त्यापेक्षांही भयानक प्रलय मानव सतत करीत राहिला असता! व्याघ्राचं व्याघ्रपण पंजांत आहे, सशाचं त्याच्या भित्रेपणांत आहे, (इथें व्याघ्रराज जरा खाकरून डौलानें शेपटी उगाचच हालवितात व ससा आणखी अंग चोरून बसतो.) नागराजाचं त्याच्या विषारी फण्यांत आहे, (नागराज फणा उगारून अभिवादन करतात.) मयूराचं त्याच्या सुरेख दिसण्यांत आहे, (मयूर नृत्यविलास करतात.) वगैरे, वगैरे! (उल्लेख न झालेले प्राणी हिरमुसतात! उल्लेख झालेले गालांतल्या गालांत हसतात.)

तेव्हां मी काय म्हणत होतों! ह्या जगाचे नि जगांतल्या नि जगाबाहेरच्या प्राणीसृष्टीचे नियम मीं फार कांटेकोर असे केले आहेत. जगाची उत्पत्ति, स्थिति आणि लय ही एक अभेद्य परंपरा आहे. संप्रदाय आहे. जीवनाचा एकच एक असा धोपटमार्ग आहे. ज्याला त्याला

त्याच चाकोरींतून जावं लागतं ! पृथ्वीला सुर्याभवतीं ! खगोलसृष्टीला एकमेकांभवतीं ! सूर्यमहाराज त्यांचे म्होरके ! ते एका जागीं बसून लक्ष ठेवीत असतात ! समजलं ?

तुम्ही आहांत तसेच उत्तम आहांत ! तुमच्यांत किंचित् जरी फरक झाला ना, तर नाश होईल तुमचा ! हॉं ! मला तुमचा राग मात्र आला नाहीं हो ! माझ्या लेकरांचा राग मी कसा करूं शकेन बरं ! मला उलट आनंदच झाला ! आपण एवढा विचार करतां, हें काय थोडं आहे ! तुमचीं निवेदनं ऐकल्यानंतर माझी खात्री झाली ती हीच, कीं प्राणीसृष्टि मीं अगदीं संपूर्ण, परिपूर्ण नि उत्कृष्ट अशी निर्माण केली आहे !

निष्काम कर्म करीत जीवन व्यतीत करा ! जा ! पळा ! पळा पाहूं आतां !

( सारे प्राणी आनंदानें उड्या मारीत पळतात ! परमेश्वर प्रसन्नपणें हसतात ! एक कृष्णमेघ त्यांना आच्छादितो. ते शेषावर कलंडतात ! )

मराठी ग्रंथ ... वाचनालय शाखा.
अनुक्रम ०१६०१ वि. ...
क्रमांक ३४४० नोंद दि. ३ १ ३८

## वसंत देशमुखांचें साहित्य

१ दस् आय् लिव्ह ! ( चिन्तनिका )
२ बाबा ! मी नोकरी करणार ! ( प्रहसन )
३ पावसांतील अश्रु ( कथा )
४ रेशनिंग ऑफिसांत कुंदा ( कादंबरी )
५ प्रश्नकान्त ( बालवाङ्मय )
६ वासंतिका ( ललित )
७ स्त्रीचित्रें ( ललित )
८ मयूरविलास ( ललित )